अमेरिकेनेही यावर प्रत्युत्तर देताना म्हटले आहे की, जर इराणने समझोता पाळला नाही, तर त्यांच्यावर पुन्हा एकदा भीषण बॉम्बबारी सुरू केली जाईल. यामुळे तणाव कमी होण्याऐवजी तो अधिकच चिघळला आहे. या प्रस्तावित समझोत्यामध्ये काही महत्त्वाच्या अटी होत्या. यात प्रामुख्याने अमेरिका आणि इस्रायल दोन आठवड्यांपर्यंत इराणवर कोणतेही हल्ले करणार नाहीत, इराण होर्मुजची सामुद्रधुनी खुली करेल आणि या काळात पाकिस्तानमध्ये शांतता वार्ता आयोजित केली जाईल, अशा तरतुदी होत्या. अमेरिकेकडून या चर्चेचे नेतृत्व उपराष्ट्राध्यक्ष जेडी वेंस करणार असल्याचे निश्चित झाले होते. तसेच इराणची मुख्य मागणी अशी होती की हा युद्धविराम संपूर्ण क्षेत्रासाठी लागू असावा, ज्यात लेबनॉन, येमेन आणि इराकचा समावेश असेल.

> सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, खुद्द इस्रायली संरक्षण दलाचा (आयडीएफ) असा अंदाज आहे की, वारंवार होणारे बॉम्ब हल्ले आणि लष्करी कारवाया करूनही हिजबुल्लाला पूर्णपणे नि:शस्त्र करणे किंवा त्यांचा पराभव करणे सध्या तरी अवास्तव आहे. अशा स्थितीत, मोठ्या प्रमाणावर नागरी बळी घेणारे हे हल्ले केवळ नेतन्याहू यांची देशांतर्गत प्रतिमा उंचावण्यासाठी आणि इराणशी होणारा करार कमकुवत करण्यासाठीच वापरले जात आहेत का, हा प्रश्न कायम राहतो.

इस्लामाबादमध्ये सुरू असलेल्या शांतता चर्चेतून दोन आठवड्यांच्या तात्पुरत्या युद्धविरामाला कायमस्वरूपी शांततेत बदलण्याची संधी आहे. परंतु, लेबनॉनचा प्रश्न हा सर्वात मोठा अडथळा ठरत आहे. इराणने स्पष्ट केले आहे की लेबनॉनवर हल्ले थांबले नाहीत तर ते करारातून बाहेर पडतील. तर इस्रायलने हिजबुल्ला विरुद्धची मोहीम थांबवण्यास नकार दिला आहे. ट्रम्प प्रशासनासाठी आता ही एक मोठी कसरत ठरणार आहे. व्हाइट हाऊसच्या प्रेस सचिव कॅरोलाईन लेविट आणि ट्रम्प यांनी लेबनॉनला वेगळा मसला ठरवून हात झटकले असले, तरी प्रत्यक्ष जमिनीवरची परिस्थिती वेगळी आहे. इराणच्या मते, प्रादेशिक शांततेशिवाय हा युद्धविराम पूर्ण होऊ शकत नाही. जर त्यांच्या मित्रपक्षांवर हल्ले होत राहिले, तर इराण केवळ प्रेक्षक बनून राहणार नाही. दुसरीकडे, जागतिक बाजारपेठेला या संघर्षाची मोठी किंमत मोजावी लागत आहे. होर्मुजची सामुद्रधुनी बंद राहिल्याने ऊर्जा पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. जर हा तिढा सुटला नाही, तर तेलाच्या किमती गगनाला भिडतील, ज्याचा परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर होईल.

या युद्धविरामाच्या घोषणेमागे ट्रम्प यांची 'अमेरिका फर्स्ट' नीती आणि अमेरिकेच्या आर्थिक हितांचे रक्षण करण्याचा प्रयत्न असल्याचे बोलले जाते. मात्र, इस्रायलची सुरक्षा आणि प्रादेशिक वर्चस्व या मुद्यांवर तडजोड करणे अमेरिकेसाठी कठीण आहे. अशा स्थितीत इस्लामाबादमधील आगामी चर्चा ही केवळ औपचारिकता ठरते की त्यातून काही ठोस तोडगा निघतो, याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. इराणने पुन्हा एकदा होर्मुज बंद करून आपली ताकद दाखवून दिली आहे, तर अमेरिकेने बॉम्बहल्ल्याची धमकी देऊन आपला इरादा स्पष्ट केला आहे. लेबनॉनमधील रक्ताचा सडा या शांतता प्रक्रियेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे करत आहे. सध्याच्या परिस्थितीत हा युद्धविराम अत्यंत नाजूक वळणावर असून, पश्चिम आशिया पुन्हा एकदा मोठ्या युद्धाच्या उंबरठ्यावर उभा असल्याचे चित्र दिसत आहे. जर राजनैतिक पातळीवर तातडीने हालचाली झाल्या नाहीत, तर हा दोन आठवड्यांचा तथाकथित शांततेचा काळ संपण्यापूर्वीच रणांगण पुन्हा पेटण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# वर्दीतील क्रौर्याला वेसण

> तामिळनाडूतील मदुरै न्यायालयाने सथानकुलम पोलीस कोठडीतील मृत्यू प्रकरणात दिलेला निकाल हा भारतीय न्यायव्यवस्थेच्या इतिहासातील एक अत्यंत कठोर आणि ऐतिहासिक निर्णय म्हणून नोंदवला जाणार आहे. २०२० मध्ये तामिळनाडूतील सथानकुलम येथे घडलेल्या जयराज आणि बेनिक्स या पिता-पुत्राच्या मृत्यूने संपूर्ण देशाला हादरवून सोडले होते. या प्रकरणात तब्बल नऊ पोलीस कर्मचाऱ्यांना दोषी ठरवून त्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. तसेच पीडित कुटुंबाला १.४० कोटी रुपयांची नुकसान भरपाई देण्याचे आदेशही दिले आहेत.

न्यायव्यवस्थेची सक्रियता, पीडितांच्या कुटुंबियांचा आणि साक्षीदारांचा अदम्य संयम आणि तपास यंत्रणेचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोन या सर्वांचा समन्वय घडून आल्यानंतर न्यायाची निर्मिती कशी होते, याचे आदर्श उदाहरण म्हणून या निकालाकडे पहावे लागेल. तामिळनाडूच्या थुथुकुडी जिल्ह्यातील सत्तानकुलम पोलीस ठाण्यात सहा वर्षांपूर्वी घडलेली ही घटना भारतीय लोकशाहीच्या आणि मानवी हक्कांच्या इतिहासातील एक काळा डाग ठरली होती. निष्पाप व्यापारी जयराज आणि त्यांचा मुलगा बेनिक्स यांचा पोलीस कोठडीत झालेल्या अमानुष छळामुळे मृत्यू झाला होता. न्यायाधीश जी. मुथुकुमारन यांनी आपला निकाल देताना स्पष्ट केले की, हे प्रकरण दुर्मिळातले दुर्मीळ या श्रेणीत मोडते.



ज्या पोलीस अधिकाऱ्यांवर कायद्याचे रक्षण करण्याची आणि शांतता राखण्याची जबाबदारी होती, त्यांनीच स्वतः कायद्याचे उल्लंघन करून दोन निष्पाप व्यक्तींवर अमानवीय अत्याचार केले.

## प्रकरण नेमके काय?

या संपूर्ण प्रकरणाची सुरुवात १९ जून २०२० रोजी झाली होती. जयराज यांना कोविड-१९ टाळेबंदीच्या नियमांचे उल्लंघन केल्याच्या संशयावरून पोलिसांनी ताब्यात घेतले होते. प्रत्यक्षात १८ जूनच्या रात्री काही मजुरांना पोलिसांनी शिवीगाळ केली होती आणि त्याबद्दल जयराज यांनी केवळ विचारणा केली होती. हा राग मनात धरून पोलिसांनी दुसऱ्या दिवशी त्यांना दुकानातून उचलले. आपल्या वडिलांना का नेले, याची चौकशी करण्यासाठी बेनिक्स जेव्हा पोलीस ठाण्यात पोहोचले, तेव्हा पोलिसांनी त्यांनाही कोठडीत डांबले. सीबीआयच्या आरोपपत्रानुसार, त्या रात्री पोलिसांनी या दोघांनाही तासनतास लाठ्यांनी बेदम मारहाण केली. हा छळ इतका भयानक होता की पिता-पुत्राच्या अंगातून रक्तस्त्राव होत होता. पुरावे नष्ट करण्यासाठी पोलिसांनी रक्ताने माखलेले कपडे फेकून दिले आणि पोलीस ठाण्यातील जमिनीवरील रक्त साफ करून घेतले. त्यानंतर दोघांनाही कोविलपट्टी तुरुंगात पाठवण्यात आले. तिथे त्यांची प्रकृती वेगाने खालावली. २२ जून रोजी बेनिक्स यांचा अतिरक्तस्त्रावामुळे मृत्यू झाला, तर त्याच्या पुढच्याच दिवशी २३ जून रोजी वडील जयराज यांनीही प्राण सोडले. या घटनेनंतर तामिळनाडूमध्ये जनक्षोभ उसळला होता.

## महिला हवालदाराची साक्ष निर्णायक

मद्रास उच्च न्यायालयाच्या मदुरै खंडपीठाने या घटनेची स्वतःहून दखल घेत न्यायालयीन चौकशीचे आदेश दिले. सुरुवातीला स्थानिक पोलिसांनी चौकशीत अडथळे आणण्याचा प्रयत्न केला होता. कोविलपट्टीच्या न्यायालयीन दंडाधिकाऱ्यांनी अहवालात नमूद केले होते की, पोलीस ठाण्यात गेल्यानंतर अधिकाऱ्यांनी त्यांना धमकावण्याचा आणि तपासात असहकार करण्याचा प्रयत्न केला. सीसीटीव्ही फुटेज देखील जाणीवपूर्वक उपलब्ध करून दिले गेले नव्हते. मात्र, एका महिला पोलीस हवालदाराने दिलेल्या साक्षीने पोलिसांचे बिंग फुटले आणि या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवण्यात आला. सीबीआयने या प्रकरणात तत्कालीन निरीक्षक एस. श्रीधर, उपनिरीक्षक रघु गणेश आणि बाळकृष्णन यांच्यासह नऊ जणांवर कट रचून हत्या केल्याचा आरोप ठेवला होता. तपासाअंती हे स्पष्ट झाले की जयराज आणि बेनिक्स यांनी कोणत्याही टाळेबंदीच्या नियमांचे उल्लंघन केले नव्हते, तर केवळ पोलिसांना जाब विचारला म्हणून त्यांना 'धडा शिकवण्यासाठी' हा जीवघेणा छळ करण्यात आला होता. प्रदीर्घ न्यायालयीन लढाईनंतर शेवटी सत्याचा विजय झाला असला तरी त्यामुळे गेलेले जीव परत येणार नाहीत.

## पोलिसांचे क्रौर्य

या प्रकरणाची पाळेमुळे पाहिली तर पोलिसांच्या कार्यपद्धतीतील अधिकाराचा गैरवापर आणि क्रौर्य स्पष्टपणे दिसून येते. या प्रकरणात सुरुवातीच्या काळात पुरावे नष्ट करण्याचे अनेक प्रयत्न झाले. पोलीस दलातील एका वरिष्ठ कर्मचाऱ्याने तर न्यायालयीन चौकशीच्या वेळी अत्यंत भीतीदायक वातावरण निर्माण केले होते. मात्र, मद्रास उच्च न्यायालयाच्या मदुराई खंडपीठाने या प्रकरणाची स्वतःहून दखल घेतली आणि तपासात हस्तक्षेप केला. उच्च न्यायालयाने महसूल अधिकाऱ्यांना पोलीस ठाण्याचा ताबा घेण्याचे आदेश दिले, जेणेकरून पुरावे सुरक्षित राहू शकतील. या खटल्यात सर्वात महत्त्वाचे वळण तेव्हा आले जेव्हा रेवती नावाच्या महिला हवालदाराने आपल्याच सहकाऱ्यांविरुद्ध साक्ष देण्याचे धैर्य दाखवले. केंद्रीय अन्वेषण विभागाने वैज्ञानिक पुराव्यांच्या आधारे पोलिसांचे गुन्हेगारी कृत्य सिद्ध केले. पोलीस ठाण्यात मिळालेले रक्ताचे नमुने आणि पीडितांचा डीएनए यांचा मेळ बसला, तसेच गुन्ह्याच्या वेळी आरोपी पोलिसांची उपस्थिती तांत्रिक पुराव्यांनी सिद्ध झाली. यामुळे पोलिसांचा बचाव पूर्णपणे कोसळला.

## न्यायालयाचा संदेश

पुनर्वसन आणि सुधारात्मक न्यायाच्या तत्त्वानुसार फाशीच्या शिक्षेवर उच्च न्यायालयात कायदेशीर खल होऊ शकतो, तरीही या निकालाने समाजात एक महत्त्वाचा संदेश दिला आहे. कायद्यापुढे सर्व जण समान आहेत, हे या निकालाने स्पष्ट केले आहे. वर्दी परिधान करणारी व्यक्तीही कायद्याहून मोठी नाही आणि नागरिकांवर बळाचा वापर करणे हा त्यांचा वैधानिक अधिकार नाही, याची जाणीव या निमित्ताने संपूर्ण पोलीस दलाला करून देण्यात आली आहे.

भारतातील कोठडीतील मृत्यूंच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास भयावह वास्तव समोर येते. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या (एनएचआरसी) अहवालानुसार, भारतात दरवर्षी शेकडो लोक पोलीस कोठडीत आपला जीव गमावतात. दुर्दैवाची बाब म्हणजे, यातील बहुतांश प्रकरणांत पोलीस कर्मचाऱ्यांना कोणतीही ठोस शिक्षा होत नाही. नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरोच्या आकडेवारीनुसार, कोठडीतील मृत्यूच्या अनेक प्रकरणांमध्ये पुराव्यांच्या अभावामुळे दोषी सुटण्याचे प्रमाण जास्त असते, परंतु सथानकुलम प्रकरणातील वैज्ञानिक पुरावे आणि प्रत्यक्षदर्शींची साक्ष यामुळे हा ऐतिहासिक निकाल शक्य झाला आहे. वर्दीचा गैरवापर करणाऱ्यांना इशारा देणारा हा निकाल आहे. येणाऱ्या काळात कदाचित राजीव गांधी हत्या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा संदर्भ घेत शिक्षेत बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही, परंतु सध्याचा निकाल हा पीडित कुटुंबासाठी आणि मानवी हक्क कार्यकर्त्यांसाठी मोठा विजय आहे. तथापि, पोलीस कोठडीतील छळ आणि मृत्यू या घटना रोखण्यासाठी केवळ कायद्याची कडक अंमलबजावणी पुरेशी नाही, तर पोलीस दलामध्ये संवेदनशीलता वाढवणे आवश्यक आहे. तपास प्रक्रियेत पारदर्शकता आणणे, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची कार्यक्षमता तपासणे आणि कोठडीतील कैद्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे याकडेही गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे.



ॲड. प्रदीप उमाप,
कायदे अभ्यासक

# निर्गुंतवणुकीचे उणेअधिक

> सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खासगीकरण किंवा त्यातील सरकारी हिश्श्याची निर्गुंतवणूक हा विषय भारतात नवीन नाही. १९९१ मध्ये देशात नवीन आर्थिक धोरण लागू झाल्यानंतर उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण या प्रक्रियांना वेग आला आणि त्यानंतर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे भवितव्य हा चर्चेचा विषय बनला. बँकांचे खासगीकरण हा मुद्दा मात्र सुरुवातीपासूनच अत्यंत वादग्रस्त राहिला. त्यामुळे वेगवेगळ्या सरकारांनी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना थेट खासगीकरणापासून दूर ठेवण्याची भूमिका घेतली.

भारतात सार्वजनिक क्षेत्रातील बँका थेट खासगी संस्थांना विकल्या गेल्याचा इतिहास नाही. मात्र विविध बँकांचे विलीनीकरण करून सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची संख्या निश्चितच कमी करण्यात आली आहे. काही वर्षांपूर्वी सार्वजनिक क्षेत्रात २७ बँका होत्या; परंतु विलीनीकरणाच्या प्रक्रियेनंतर ही संख्या आता १२ वर आली आहे. सध्या आयडीबीआय बँकेत केंद्र सरकारचा हिस्सा ५१ टक्क्यांपेक्षा कमी असला तरी लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या सरकारी संस्थेचा त्यात मोठा हिस्सा आहे. त्यामुळे एकूण मिळून सरकारचा नियंत्रणात्मक हिस्सा सुमारे ९५ टक्क्यांपर्यंत पोहोचतो. विशेष म्हणजे गेल्या काही वर्षांत सरकार आयडीबीआय बँकेच्या स्ट्रॅटेजिक सेलच्या दिशेने पावले टाकत होते आणि त्यासाठी प्रस्तावही मागवण्यात आले होते. मात्र अलीकडील वृत्तांनुसार सरकारने आता या बँकेच्या स्ट्रॅटेजिक सेलची प्रक्रिया थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रश्नावर मोठी चर्चा सुरू होती आणि जर हा व्यवहार पूर्ण झाला असता तर सार्वजनिक क्षेत्रातील बँकेच्या खासगीकरणाचे हे आपल्या प्रकारातील पहिले मोठे उदाहरण ठरले असते.



डॉ. अश्वनी महाजन,
ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे खासगीकरण करावे का, हा दीर्घकाळ चाललेला वाद आहे. या वादात दोन्ही बाजूंनी महत्त्वाचे तर्क मांडले गेले आहेत. विशेषतः आयडीबीआय बँकेच्या संदर्भात खासगीकरणाला विरोध करणाऱ्यांकडेही काही ठोस मुद्दे आहेत. मात्र या चर्चेत पुढे जाण्यापूर्वी आयडीबीआय बँकेचा इतिहास समजून घेणे आवश्यक आहे. काही वर्षांपूर्वी ही बँक मोठ्या आर्थिक अडचणीत सापडली होती; पण आता ती त्या टप्प्यातून बाहेर पडून पुन्हा नफ्यात आलेली संस्था बनली आहे. सुरुवातीला इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया ही एक डेव्हलपमेंट फायनान्स संस्था होती. आर्थिक धोरणांमध्ये झालेल्या बदलांमुळे इतर डेव्हलपमेंट फायनान्स संस्थांप्रमाणेच तिला पुढे कमर्शियल बँकेत रूपांतरित करण्यात आले.

खासगीकरणाच्या बाजूने मांडले जाणारे काही तर्कही महत्त्वाचे आहेत. समर्थकांचे म्हणणे असे की, आयडीबीआय बँकेचे खासगीकरण झाले तर बाजारातील शिस्त अधिक बळकट होईल आणि भांडवलाचे अधिक कार्यक्षम वाटप होईल. दुसरे म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांवर असलेला प्रशासकीय विलंब आणि राजकीय हस्तक्षेप कमी होईल. त्यामुळे निर्णयप्रक्रिया अधिक जलद होऊ शकते. तिसरे म्हणजे खासगीकरणामुळे मालमत्तेच्या गुणवत्तेत सुधारणा होऊ शकते आणि नॉन-परफॉर्मिंग ॲसेट्स म्हणजेच एनपीए व्यवस्थापन अधिक प्रभावी होऊ शकते. आयडीबीआय बँक दीर्घकाळ एनपीएच्या समस्यांशी झुंज देत होती. चौथा मुद्दा असा मांडला जातो की खासगीकरणामुळे बँकिंग सेवांमध्ये नवकल्पना वाढू शकतात, ग्राहककेंद्रित उत्पादने विकसित होऊ शकतात आणि डिजिटल परिवर्तनाला गती मिळू शकते. पाचवा मुद्दा म्हणजे व्यवस्थापन मंडळाची जबाबदारी अधिक स्पष्ट होऊन कॉर्पोरेट गव्हर्नन्समध्ये सुधारणा होण्याची शक्यता आहे. सहावा मुद्दा असा की आयडीबीआय बँक चालू ठेवण्यासाठी सरकारला अनेकदा भांडवल घालावे लागले. खासगीकरणामुळे करदात्यांच्या पैशातून वारंवार होणारी भांडवल गुंतवणूक कमी होऊ शकते.



मात्र सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची गरज अधोरेखित करणारे तर्कही तितकेच महत्त्वाचे आहेत. भारतासह जगभरात खासगी बँका दिवाळखोरीत गेलेल्या अनेक घटना दिसतात; परंतु सार्वजनिक क्षेत्रातील बँक पूर्णपणे कोसळून ठेवीदारांचे पैसे बुडाल्याचे उदाहरण जवळजवळ नाही. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या बाबतीत सरकारची हमी असल्याने ठेवीदारांचा विश्वास कायम राहतो. त्यामुळे अशा बँकांमध्ये अचानक पैसे काढण्यासाठी धावाधाव होण्याची शक्यता अत्यल्प असते. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांवर असलेला विश्वास हा सामान्य नागरिकांना आपल्या बचती सुरक्षितपणे जमा करण्यास प्रोत्साहित करतो. देशातील घरगुती बचतीचे महत्त्व मोठे आहे, कारण त्यामुळे बाहेरील आर्थिक साधनांवर अवलंबित्व कमी होते. १९६९ मध्ये १४ खासगी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले आणि १९८० मध्ये आणखी सहा बँका राष्ट्रीयीकृत करण्यात आल्या. या निर्णयामागील प्रमुख उद्दिष्ट सर्वसमावेशक विकासाला चालना देणे हे होते. शेती, लघुउद्योग, शिक्षण, निर्यात अशा प्राधान्य क्षेत्रांना कर्जपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची महत्त्वाची भूमिका होती. या बँकांनी अतिशय लहान कर्जदारांनाही कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध करून दिले. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून विविध नियम आणि निर्देश दिले जात असले तरी आर्थिक समावेशनाच्या क्षेत्रात खासगी बँका सार्वजनिक क्षेत्रातील बँकांइतकी सक्रिय भूमिका बजावताना दिसत नाहीत. आज ठेवी आणि कर्जवाटपात खासगी बँकांचा हिस्सा सुमारे ३६ टक्क्यांपर्यंत पोहोचला असला तरी जन धन खात्यांमध्ये त्यांचा वाटा तीन टक्क्यांपेक्षाही कमी आहे. ही आकडेवारी आर्थिक समावेशनात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे योगदान स्पष्ट करते. याशिवाय दीनदयाल अंत्योदय योजनेअंतर्गत सुमारे सहा कोटी महिलांना दिल्या जाणाऱ्या उपजीविका कर्जांपैकी जवळपास ९० टक्के कर्जे सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि त्यांच्या प्रायोजित प्रादेशिक ग्रामीण बँका देत आहेत. तसेच रस्त्यावर लहान व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांान कर्ज देण्याचे कामही प्रामुख्याने सार्वजनिक क्षेत्रातील बँकांकडूनच केले जाते. या पार्श्वभूमीवर खासगी बँकांचा नफा अधिक दिसणे स्वाभाविक आहे, कारण त्यांच्यावर आर्थिक समावेशनाची जबाबदारी तितक्या प्रमाणात नसते. या सर्व बाबींचा विचार केला तर आयडीबीआय बँकेच्या स्ट्रॅटेजिक सेलची प्रक्रिया थांबवण्याचा निर्णय अनेकांच्या मते योग्य ठरू शकतो. कारण बँकिंग ही केवळ नफा कमावण्याची व्यवस्था नसून ती देशाच्या आर्थिक रचनेतील एक महत्त्वाचा सार्वजनिक घटक आहे. त्यामुळे आर्थिक समावेशन, सामाजिक जबाबदारी आणि राष्ट्रीय हित या व्यापक निकषांवर विचार केल्यास सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे अस्तित्व आणि त्यांची भूमिका आजही अत्यंत महत्त्वाची राहते.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# ‘एसटी’ची दरिद्री सेवा!

**महाराष्ट्र** राज्य मार्ग परिवहन महामंडळ म्हणजेच राज्याची एसटी बस सेवा ही कायमस्वरूपी तोट्यात असल्याच्या तक्रारी ऐकू येत असतात. परंतु महाराष्ट्रातली ही उत्तम एसटी सेवा आहे हे नाकारून चालणार नाही. अर्थात काही ठिकाणी एसटीचा गलथानपणा पाहायला मिळत असतो. राज्याच्या खेड्यापाड्यापर्यंत पोहोचणारी आणि सर्वसामान्य माणसाला किफायत दरात इच्छित ठिकाणी पोहोचवण्याचं काम करणारी एसटी ही महाराष्ट्राच्या सामान्य जनतेची एक अनिवार्य गरज ठरलेली आहे. आज खाजगी बस वाहतूक मोठ्या प्रमाणावर होते, इतरही गाड्यांच्या माध्यमातून खाजगी प्रवासी वाहतूक जोरात चालू असते. म्हणजेच खाजगीकरणाची स्पर्धा असूनही महाराष्ट्राची एसटी सेवा लोकप्रिय ठरते. ही सरकारच्यादृष्टीने खूप मोठी जमेची बाजू ठरते.अशा अनुकूल परिस्थितींत एसटी महामंडळ तोट्यात आहे हे एक बेगडी सत्य म्हणावे लागेल. कारण त्यात काही फारसे तथ्यांश आढळून येत नाही. केवळ तोट्यात असल्याचे चित्र निर्माण केले जाते. कारण एसटी जर व्यवस्थितपणे, व्यावसायिक पद्धतीने चालवली तर एसटी महामंडळाला प्रचंड नफा होऊ शकतो. याचे वानगीदाखल अगदी छोटंसं ताजं उदाहरण म्हणजे गेल्या वर्षभरामध्ये राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून शालेय विद्यार्थ्यांच्या सहलीसाठी ज्या एसटी बसेस उपलब्ध करून दिल्या. त्यामधून एसटीला बराच मोठा फायदा झाल्याचे दिसते. यावर्षी तब्बल १२७ कोटी रुपये एसटी महामंडळाला केवळ शैक्षणिक सहलीसाठी दिलेल्या बसेसच्या माध्यमातून मिळाले आहेत. गेल्या वर्षी याच शैक्षणिक सहलींमधून ९३ कोटी रुपये उत्पन्न एसटीला झाले होते. म्हणजे या वेळेला ३३ कोटींची झालेली वाढ ही एसटी महामंडळासाठी कितीतरी महत्त्वपूर्ण ठरते. दिवाळीनंतर शालेय सहली या मोठ्या प्रमाणावर सुरू होतात आणि शिक्षण विभागाच्या अटी शर्तींचे पालन करून या बसेस सहलीसाठी एसटी महामंडळाकडून घेतल्या जातात.

### देशातील सर्वात सर्वात श्रीमंत महामंडळ

विशेषतः राज्य परिवहन महामंडळाने यंदा जाणीवपूर्वक चांगल्या दर्जाच्या बसेस शाळांच्या सहलीसाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला होता आणि या नव्या अद्ययावत बसेस दिल्यामुळे विद्यार्थ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि आरामदायी झालेला आहे. त्याचा सुद्धा एक प्रभाव या शैक्षणिक वर्षातल्या सहलींच्या माध्यमातून पाहायला मिळालेला आहे. एसटीमार्फत सुरक्षित सहली आणि त्याही माफक दरात उपलब्ध झाल्याने शाळा आणि महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना एसटीचा हा मोठा दिलासा यावर्षी मिळू शकला. जर एसटीला केवळ सहलींच्या माध्यमातून इतका मोठा नफा होत असेल, इतके मोठे उत्पन्न मिळत असेल. तर दैनंदिन एसटीच्या व्यवहारांमध्ये जर शिस्त आणि कार्यक्षमता आणली तर निश्चितच महाराष्ट्राचे एसटी मंडळ हे देशातील सर्वात श्रीमंत महामंडळ होऊ शकते. परंतु सतत गैरकारभार, भ्रष्टाचार आणि कर्मचाऱ्यांच्या अरेरावीमुळे सुद्धा एसटी महामंडळ फायद्यामध्ये येत नाही. म्हणजे एसटीवर लक्ष्मी प्रसन्न होऊ शकते. परंतु दरिद्री कारभारामुळे ती टिकत नाही. आज एसटीची दरवाढ होऊनही लोक एसटीने प्रवास करणे पसंत करतात. कारण एक खात्रीशीर प्रवास म्हणून लोकांना एसटीचे अधिक महत्त्व वाटत असते. मोठ्या महानगरांमधून चालणाऱ्या शिवनेरी किंवा शिवाई यासारख्या बस सेवांचा प्रवासी आवर्जून फायदा घेत असतात. म्हणजे ज्या एसटी महामंडळाला तोट्याचे ग्रहण आहे ते अर्धसत्य म्हणावे लागेल. वस्तूतः एसटी महामंडळ फायद्यात आहे असाच त्याचा एक निष्कर्ष काढता येऊ शकतो. आता एसटी महामंडळाने विविध योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. ज्याप्रमाणे बस आगारांच्या जागेचा वापर करायचा त्या ठिकाणी पेट्रोल पंप सुरू करून बाहेरच्या लोकांनाही पेट्रोल डिझेल उपलब्ध करून द्यायचे म्हणजे त्या पेट्रोल डिझेलच्या विक्रीतून महामंडळाला फायदा होऊ शकेल. आगारांच्या रुपाने महामंडळाकडे अक्षरशः हजारो एकर जमीन आहे त्यातली बरीचशी जमीन ही उपयोगाशिवाय पडून आहे त्याचा योग्य पद्धतीने वापर केला तर त्यातूनही एसटी महामंडळाला प्रचंड प्रमाणात उत्पन्न मिळू शकेल. सगळी बस स्थानक अत्याधुनिक स्वरूपाची केली आणि त्यातल्या जाहिरातींच्या माध्यमातून सुद्धा मोठा उत्पन्नाचा स्त्रोत एसटी महामंडळाला प्राप्त करता येऊ शकतो.

### तर महाराष्ट्र नाव सार्थ


आज एसटी महामंडळाला व्यावसायिक व्यवस्थापनाची गरज आहे आणि तिथे चालणारा भ्रष्टाचार उखडून काढण्याची आवश्यकता आहे. अर्थात या महामंडळावर होणाऱ्या नियुक्त्या या राजकीय स्वरूपाच्या असतात स्वाभाविकपणे तिथला भ्रष्टाचार इतक्या सहजासहजी निपटून काढणे शक्य नाही. परंतु जर योग्य पद्धतीने एसटी महामंडळाचे व्यवस्थापन राबवले गेले तर त्या कार्यक्षमतेतून आणि प्रवाशांकडून मिळणारा प्रतिसाद योग्य पद्धतीने हाताळला गेला तर एसटी महामंडळाला होणारा नफा हा सर्वाधिक असू शकतो म्हणजे एसटी कधीच तोट्यात राहणार नाही किंबहुना एसटी महामंडळाकडे अधिकचा पैसा शिल्लक राहून अनेक चांगल्या योजनांसाठी त्याचा उपयोग करता येऊ शकतो. तो अनेकांना मदत करणारा ही ठरू शकतो आज महिलांना ५०% भाडे सवलत, ज्येष्ठांना मोफत प्रवास अशा प्रकारच्या सवलती असून देखील एसटीचे उत्पन्न जर या पद्धतीने वाढत असेल किंवा वाढवता येऊ शकत असेल तर या तोट्याला व्यवस्थापनाचा गलथानपणाच कारणीभूत ठरतो. जवळपास गेली शंभर वर्षे राज्यातील एसटी सेवा अव्याहतपणे सुरू आहे. आज राज्यातल्या जवळपास सगळ्या भागामध्ये पोहोचलेली एसटी महाराष्ट्राच्या सार्वजनिक परिवहन सेवेतले वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण ठरते. महाराष्ट्राला विकसित राज्य व्हायचे असेल तर रोज काही कोटी लोकांची ने-आण करणारी एसटीची सेवा विकसित झाली पाहिजे. म्हणजेच या महामंडळाच्या नावात असलेले महाराष्ट्र नावही सार्थ होऊ शकेल.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

आज ज्या ज्या ठिकाणी तुम्ही महत्त्वाचे व्यक्ती बनले आहात
त्याचा एक ठराविक काळ आहे हे स्वीकारा.
नंतर त्रास होणार नाही.

## पंचांग



रवी उदय- ०६-२५,
रवी अस्त- १८-५४

**रविवार १२ एप्रिल २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** चैत्र कृष्ण दशमी**
**नक्षत्र - श्रवण**
**जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० मकर**

**नाना महाराज तराणेकर पुण्यतिथी**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४०० ००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
‘नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस’चे प्रकाशन दैनिक
‘नवाकाळ’ आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### मँगो स्मुदी



★**साहित्य** : पिकलेला आंबाः १ मोठा (तुकडे केलेला) किंवा १ कप मँगो पल्प
थंड दूधः १ कप (किंवा नारळाचे दूध)
दहीः १/२ कप (घट्ट आणि ताजे) साखर किंवा मधः चवीनुसार (आंबा गोड असेल तर कमी वापरा)
बर्फाचे तुकडेः ४-५ वेलची
पूडः चिमूटभर (पर्यायी)
सजावटीसाठीः ड्राय फ्रूट्सचे तुकडे किंवा आंब्याचे लहान फोडी

★**कृती:**-तयारीः सर्वप्रथम आंबा सोलून त्याचे मध्यम आकाराचे तुकडे करून घ्या. ब्लेंडिंगः मिक्सरच्या भांड्यात आंब्याचे तुकडे, थंड दूध, दही आणि साखर एकत्र करा. एकजीव करणेः आता यात बर्फाचे तुकडे आणि वेलची पूड टाकून सर्व जिन्नस मिक्सरला फिरवून घ्या, जोपर्यंत मिश्रण एकदम गुळगुळीत होत नाही.
सर्व्हिंगः तयार झालेली स्मुदी एका मोठ्या काचेच्या ग्लासमध्ये ओता.
सजावटः वरून थोडे बदामाचे काप किंवा आंब्याचे छोटे तुकडे टाकून थंडगार सर्व्ह करा. घट्ट स्मुदीः तुम्हाला स्मुदी अधिक घट्ट हवी असेल, तर आंब्याचे तुकडे आधी १ तास फ्रीजरमध्ये ठेवून मग वापरा.
हेल्दी पर्यायः साखरेऐवजी तुम्ही मधाचा किंवा गुळाचा वापर करू शकता.



## क्रीडा

# पंजाब किंग्सचा संघ विजयासह अपराजित

## श्रेयस अय्यरच्या खेळीपुढे हैदराबाद फेल



**प्रियांश आर्य, प्रभसिमरन सिंग आणि श्रेयस अय्यर यांच्या अफलातून अर्धशतकांच्या जोरावर पंजाब किंग्सने सनरायझर्स हैदराबादचा ६ गडी राखून पराभव केला. न्यू चंदीगडच्या महाराजा यादविंद्र सिंग क्रिकेट स्टेडियमवर आज झालेल्या आयपीएलच्या १७ व्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना हैदराबादने २० षटकांत ६ गडी गमावून २१९ धावा केल्या. या प्रत्युत्तरात पंजाबने १८.५ षटकांत ४ गडी गमावून २२३ धावा करून सामना जिंकला. या विजयासह पंजाब अजूनही अपराजित आहे.**

■ चंदीगड

**पंजाब** किंग्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हैदराबादचा सलामीवीर अभिषेक आणि हेड यांनी पहिल्याच षटकापासून पंजाबच्या गोलंदाजांवर हल्ला चढवला. यादरम्यान, हेडपेक्षा अभिषेक अधिक आक्रमक शैलीत खेळताना दिसला. अभिषेकने १८ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. यानंतर हेडनेही आक्रमक पवित्रा घेतला आणि हैदराबादने पॉवरप्लेमध्ये एकही गडी न गमावता १०५ धावा केल्या. पॉवरप्ले संपल्यानंतर शशांक सिंगने एकाच षटकात अभिषेक आणि हेड या दोघांना बाद केले. शशांकने सर्वप्रथम हेडला बाद केले, जो ५ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने २३ चेंडूंमध्ये ३८ धावा केल्या. अभिषेकने ५ चौकार आणि ८ षटकारांच्या मदतीने २८ चेंडूंमध्ये ७४ धावा ठोकल्या. ही जोडी माघारी परतल्यानंतर हैदराबादची धावगती मंदावली. पंजाबच्या गोलंदाजांनी जोरदार पुनरागमन केले. हेनरिक क्लासेनने काही प्रमाणात संघाला सावरले, पण तो आक्रमक फलंदाजी करू शकला नाही. क्लासेनने ३९ धावा आणि इशान किशनने २७ धावा केल्या. अनिकेत वर्माने १८ आणि सलील अरोराने ९ धावांचे योगदान दिल्याने हैदराबादने २१९ धावांपर्यंत मजल मारली.

या लक्ष्याचा पाठलाग प्रियांश आर्य, प्रभसिमरन सिंग या सलामीच्या फलंदाजांनी हैदराबादला पॉवरप्लेमध्ये कोणतेही यश मिळवू दिले नाही. प्रियांशने १६ चेंडूंमध्ये आपले अर्धशतकही पूर्ण केले. मात्र, शिवांग कुमारने प्रियांश आर्याला बाद करून पंजाबला पहिला धक्का दिला. त्याने ५ चौकार आणि ५ षटकारांसह २० चेंडूंत ५७ धावा केल्या. त्यानंतर अर्धशतक पूर्ण केल्यावर लगेचच प्रभसिमरनही बाद झाला. त्याने ४ चौकार आणि ४ षटकारांसह २५ चेंडूंमध्ये ५१ धावा केल्या. त्यानंतर शिवांगने कूपर कॉनोलीची विकेट घेतली, जो १२ चेंडूंमध्ये एका चौकाराच्या मदतीने ११ धावा करून बाद झाला. तीन विकेट पडल्यानंतर कर्णधार श्रेयसने इम्पॅक्ट प्लेअर नेहल वढेराच्या मदतीने डाव सावरला. वढेरा आणि श्रेयसने चौथ्या विकेटसाठी ६९ धावांची भागीदारी केली, जी हर्ष दुबेने तोडली. एका षटकाराच्या मदतीने वढेरा १४ चेंडूंमध्ये १४ धावांवर बाद झाला. तथापि श्रेयसने चिकाटी दाखवली आणि वेग वाढवून आक्रमक फलंदाजी सुरू केली. श्रेयसने ५ चौकार आणि ५ षटकारांच्या मदतीने ३३ चेंडूंत नाबाद ६९ धावा केल्या. त्याच्या खेळीमुळे पंजाबने १८.५ षटकांत विजयी आकडा गाठला.

# सॅमसनच्या शतकामुळे चेन्नईने पहिल्या विजयाचा नारळ फोडला

■ चेन्नई



**सलामीवीर** संजू सॅमसनच्या ५६ चेंडूंत ११५ धावांच्या अफलातून खेळीच्या बळावर चेन्नई सुपर किंग्सने दिल्ली कॅपिटल्सला २३ धावांनी नमवून आयपीएल हंगामातील आपल्या चौथ्या सामन्यात पहिल्या विजयाचा नारळ फोडला. चेन्नईच्या एम ए चिदंबरम स्टेडियममध्ये झालेल्या आयपीएलच्या १८ व्या सामन्यात चेन्नईने २ बाद २१२ धावा केल्या होत्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना दिल्लीला सर्वबाद १८९ धावांपर्यंतच मजल मारता आल्याने दुसरा पराभव पत्करावा लागला.

चेन्नईचा सलामीवीर ऋतुराज गायकवाड १५ धावा करून बाद झाल्यानंतर संजू सॅमसन आणि आयुष म्हात्रे यांनी धडकेबाज फलंदाजी करून संघाची धावसंख्या १७.२ षटकांत १ बाद १७५वर पोहोचवली. मग आयुष म्हात्रे रिटायर्ड आउट झाला. त्याने ३६ चेंडूंत ४ षटकार आणि ३ चौकारांसह ५९ धावा केल्या. सॅमसनने ५२ चेंडूंत शतक पूर्ण केले. शेवटी शिवम दुबे १० चेंडूंत २० धावा आणि सॅमसन ५६ चेंडूंत ११५ धावा करून नाबाद राहिल्यामुळे चेन्नईला पहिल्या डावात २ बाद २१२ धावा करता आल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना दिल्लीचा सलामीवीर पाथुम निस्संकाने धडाकेबाज सुरुवात करून ४१ धावांवर झेलबाद झाला.

केएल राहुल १८, समीर रिझवी ६, कर्णधार अक्षर पटेल १, डेव्हिड मिलर १७, आशुतोष शर्मा १८, औकिब नबी ४ धावांवर बाद झाला. ट्रिस्टन स्टब्सने चांगली फटकेबाजी केली. मात्र ती तोकडी पडली. त्यामुळे दिल्लीने सर्वबाद १८९ धावांपर्यंत मजल मारली.

# नवशक्ती, बालवीर, जय भवानीची विजयाने सुरुवात

■ मुंबई

अजित पवार यांच्या स्मरणार्थ मुंबई उपनगर जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने हनुमान क्रीडा मंडळ आणि गौरी शंकर क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कुर्ला क्रीडा केंद्रातून आयोजित कबड्डी स्पर्धेत नवशक्ती स्पोर्ट्स अकॅडमी (चेंबूर), जय भवानी क्रीडा मंडळ (घाटकोपर), बालवीर स्पोर्ट्स क्लब (चेंबूर), भानवे अकॅडमी (कुर्ला) यांनी कुमार गटात विजयी सलामी दिली तर प्रथम श्रेणी पुरुष गटात अंबिका सेवा मंडळ (कुर्ला), शूर जवान क्रीडा मंडळ (मुलुंड), सत्यम सेवा संघ (कांजूरमार्ग), मुलुंड क्रीडा केंद्र यांनी पहिल्या फेरीचे सामने जिंकले. कोहिनूर बॉईज विरुद्ध नवशक्ती स्पोर्ट्स अकॅडमी यांच्यात झालेल्या सामन्यात नवशक्तीने सहज विजयी मिळवला. लोकमान्य शिक्षण संस्था विरुद्ध



जय भवानी क्रीडा मंडळ यांच्यात झालेला सामन्यात मध्यंतराला आघाडी घेऊन सुद्धा लोकमान्य शिक्षण संस्थेला आघाडी कायम राखता आली नाही.

# विक्रोळीत १८ एप्रिलपासून आमदार चषक कबड्डी स्पर्धा

■ मुंबई

**हिंदुहृदयसम्राट** शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विक्रोळी, टागोरनगर ग्रुप नंबर ३ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात पुरुष आणि महिला गटांसाठी आमदार चषक कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा १८ ते २१ एप्रिल या कालावधीत सायंकाळी ७ ते १० या वेळेत होणार आहे. शिवसेना आमदार सुनील राऊत यांच्या मार्गदर्शनाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

# मुंबई आज पराभवाची मालिका खंडित करणार

## लखनौचा विजयी आगेकूच कायम ठेवण्याचा प्रयत्न

■ मुंबई/लखनौ

**आयपीएलमध्ये** उद्या दोन सामने होणार आहेत. लखनौच्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी एकना क्रिकेट स्टेडियमवर दुपारी ३.३० वाजता होणाऱ्या आयपीएलच्या १९ व्या सामन्यात लखनौ सुपर जायंट्स आणि गुजरात टायटन्सचा सामना होणार आहे, तर मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर रात्री ७.३० वाजता मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू भिडणार आहे. मुंबईचा संघ पराभवाची मालिका खंडित करण्यासाठी सज्ज झाला असून, राजस्थानविरुद्ध एकमेव पराभव पत्करलेल्या बंगळुरू मुंबईचा धुव्वा उडवण्याचा प्रयत्न करणार आहे. लखनौ आणि गुजरातचा संघ विजयी आगेकूच कायम ठेवण्यासाठी मैदानावर उतरणार आहे.



या हंगामात आतापर्यंत लखनौने तीनपैकी दोन सामने जिंकले आहेत. त्यामुळे लखनौ आयपीएलच्या गुणतालिकेत ४ गुणांसह पाचव्या स्थानावर आहे. गुजरातने ३ सामन्यांत फक्त १ विजय मिळवला. परिणामी गुजरात गुणतालिकेत २ गुणांसह सातव्या स्थानावर विराजमान आहे. मुंबईला ३ सामन्यांत फक्त एकच विजय मिळवण्यात यश आले. त्यामुळे मुंबई गुणतालिकेत २ गुणांसह आठव्या स्थानावर आहे. तीन सामन्यांत दोन विजय मिळवल्यामुळे बंगळुरू गुणतालिकेत ४ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. मुंबई इंडियन्सचा सामना घरच्या मैदानावर होणार असला तरी सलामीवीर रोहित शर्मा आणि जॉनी बेअरस्टो यांना आपल्या संघाला विजय करण्यासाठी चांगली सुरुवात करून देणे गरजेचे आहे. तिलक वर्मा, सूर्यकुमार यादव आणि हार्दिक पंड्या यांनाही आक्रमक खेळी करणे आवश्यक आहे. बंगळुरूला मुंबईविरुद्ध विजय मिळवणे सोपे नाही.

# राज्य अजिंक्यपद कॅरम स्पर्धा

## प्रशांत-समृद्धीला अग्रमानांकन

■ नवी मुंबई

**नवी** मुंबई स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने ६० वी सिनियर महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद कॅरम स्पर्धा १३ ते १६ एप्रिलदरम्यान नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशन, सेक्टर १-ए, वाशी, नवी मुंबई येथे संपन्न होणार आहे. पुरुष एकेरी, महिला एकेरी, पुरुष वयस्कर एकेरी आणि महिला वयस्कर एकेरी अशा ४ गटांत मिळून एकंदर ४८६ स्पर्धक या स्पर्धेत सहभाग घेणार आहेत. पुरुष एकेरी गटात मुंबईच्या विश्वविजेत्या प्रशांत मोरे आणि महिला एकेरी गटात ठाण्याच्या समृद्धी घाडिगावकरला प्रथम मानांकन देण्यात आले आहे.

# गितेश, संगीता, सुशांत यांची विजयी सलामी

■ मुंबई

**को**-ऑपरेटिव्ह बँक एम्प्लॉईज युनियन यांच्या वतीने ६६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित आंतर को-ऑपरेटिव्ह बँक कॅरम स्पर्धेत गितेश कोपरगावकर, प्रमोद कांबळे, इस्माईल सिद्दिकी, संगीता बेगडे, सुप्रिया बने, गौरी कोरगावकर, मानस सावंत, शुभम मांडवगोडे, सार्थक स्वामी सोमनाथ यांनी विजयी सलामी दिली.

या स्पर्धेचे प्रायोजकत्व मुंबईतील समता सहकारी बँकेने स्वीकारलेले असून स्पर्धेच्या उद्घाटन युनियनचे अध्यक्ष माजी खासदार आनंद अडसूळ, युनियनचे सल्लागार माजी आमदार कॅप्टन अभिजित अडसूळ यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

कॅरम पुरुष एकेरीत गितेश कोरगावकरने जयदेववर २३-०, २१-०, प्रमोद कांबळेने देवेंद्र पिसाळवर ९-१०, ११-२, १४-७, विशाल देशमुखने दर्शन बोडूळवर ४-१५, ९-५, २४-०, इस्माईल सिद्दिकीने रोहित शिर्केने २५-२, १३-० अशा विजय मिळवला. महिला एकेरीत संगीता बेंगडेने मनवा रेडकरवर १२-०, १५-०, सुप्रिया बनेने साक्षी सरफरेवर १९-४, १६-०, गौरी कोरगावकरने श्रुती रोढीवर १५-०,१४-०, असा विजय मिळवला.

# जात जनगणनेला स्थगिती मागणारी याचिका फेटाळली

■ नवी दिल्ली

**सर्वोच्च** न्यायालयाने प्रस्तावित जात जनगणना रोखण्याची याचिका फेटाळत याचिकाकर्त्याला कडक शब्दांत फटकारले. सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या खंडपीठाने या याचिकेतील भाषेवर नाराजी व्यक्त करत ही उद्धटपणाची भाषा असल्याचे म्हटले. हे प्रकरण धोरणात्मक निर्णय असल्याने ही याचिका पूर्णपणे फेटाळून लावली.

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल पंचोली यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. यावेळी स्वतः याचिकाकर्ते न्यायालयात उपस्थित होते. यावेळी

## याचिकाकर्त्याला सुप्रीम कोर्टाने फटकारले!

सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी याचिकाकर्त्याला अर्जातील भाषेवरून फटकारले. सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी याचिकाकर्त्याला उद्देशून म्हटले की, 'या याचिकेत वापरलेली ही भाषा तुम्ही कुठे शिकलात? ही इतकी उद्धट भाषा तुम्ही कशी वापरू शकतात? तुम्ही अशा याचिका लिहिताच कशा? यापुर्वी २ फेब्रुवारी रोजी देखील



सर्वोच्च न्यायालयाने या जनगणनेतील जातीच्या आकडेवारीची नोंद,वर्गीकरण आणि पडताळणी प्रक्रियेला आव्हान देणारी याचिका फेटाळून लावली होती.

# सामाजिक बांधिलकी फाऊंडेशनतर्फे आज मोफत आरोग्य तपासणी शिबिर

■ मुंबई

**सामाजिक** बांधिलकी फाऊंडेशनतर्फे गिरगाव-ठाकुरद्वार परिसरातील नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर रविवार, १२ एप्रिल रोजी सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत पार पडणार आहे. या शिबिरात बीएमआय तपासणी, नेत्र तपासणी, रक्तातील साखर तपासणी, लिव्हर फंक्शन टेस्ट, हाडांची घनता तपासणी, ईसीजी तसेच डॉक्टरांचा विनामूल्य सल्ला उपलब्ध करून दिला जाणार आहे. हे शिबिर क्षत्रिय न्याती निवास हॉल, राजा राम मोहन रॉय रोड, चर्नी रोड (पूर्व) येथे आयोजित करण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकी फाऊंडेशन, वॉकहार्ट हॉस्पिटल आणि डॉ. अग्रवाल आय क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात येत आहे.

# कोट्यवधींच्या हिबानामा प्रकरणात जमिनीच्या मूळ मालकाला अटक

**भुमरेंच्या चालकावर कारवाईची शक्यता**

■ छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर शहरात गाजत असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या हिबानामा (दानपत्र) प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत जमिनीचा मूळ मालक मीर मेहमूद अली याला अटक केली आहे. त्याच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

शिंदे गटाचे खासदार संदीपान भुमरे यांच्या चालकाच्या नावावर ९ एकर जमीन हिबानामा केल्याच्या प्रकरणामुळे हा वाद उफाळला होता. या व्यवहारात अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला होता. आर्थिक गुन्हे शाखेकडून मीर मेहमूद अली याला तपासासाठी हजर राहण्याची नोटीस देण्यात आली होती. ३ दिवसांच्या मुदतीत तो हजर न राहिल्याने अखेर पोलिसांनी त्याला अटक केली. या प्रकरणात भुमरे यांचा चालक जावेद रसूल शेख (खान) याच्यावरही कारवाईची शक्यता वर्तवली जात आहे. त्याच्यावर अटकेची टांगती तलवार असल्याची चर्चा आहे. यापूर्वी त्याने अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला होता, नंतर तो मागे घेण्यात आला. परभणीतील एका वकिलाने या प्रकरणात तक्रार दाखल केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.

# भाजपा ६ महिन्यांत ५० लाख प्रशिक्षित कार्यकर्ते तयार करणार

■ नवी दिल्ली

**देशातील** सर्वात मोठा राजकीय पक्ष असलेल्या भारतीय जनता पक्षने पुढील सहा महिन्यांत तब्बल ५० लाख प्रशिक्षित कार्यकर्ते तयार करण्याची महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केली आहे. यासाठी पक्षाने पूर्णपणे डिजिटल प्लॅटफॉर्म विकसित केला असून, अशी व्यवस्था करणारा भाजपा देशातील पहिलाच पक्ष ठरल्याचे सांगण्यात येत आहे.

## डिजिटल प्लॅटफॉर्मवर मोठी मोहीम

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

दिल्लीतील पक्ष मुख्यालयात राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांच्या अध्यक्षतेखाली सुमारे २५० प्रमुख पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत आगामी संघटनात्मक विस्तार, प्रशिक्षण कार्यक्रम आणि डिजिटल प्रणालीच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. पक्षाच्या नियोजनानुसार या डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना भाजपाचा इतिहास, विचारधारा आणि संघटनात्मक प्रवास यांची माहिती दिली जाणार आहे.

# बोरीवलीत रात्री माती टाकून दिवसा गाळ काढण्याचा दावा

■ मुंबई

**बोरीवली** पश्चिम येथील नाला साफसफाईच्या कामात कथित गैरप्रकार उघडकीस आल्याचा दावा स्थानिक नागरिकांनी केला आहे. रात्री नाल्यात दगड व माती टाकून दिवसा त्यालाच गाळ म्हणून काढल्याचे दाखवले जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे साफसफाईच्या नावाखाली महापालिकेची फसवणूक होत असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. या संदर्भात आर/मध्य विभागाच्या सहाय्यक आयुक्तांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणी दोष सिद्ध झाल्यास संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्यात येईल, असे आश्वासन अतिरिक्त आयुक्तांनी दिले आहे.



१४ एप्रिल रोजी होणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीपूर्वी एक कलाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मूर्ती तयार करत आहे.

# परिवहन मंत्र्यांनी मिरा भाईंदर पालिका आयुक्तांना दिला दम

■ भाईंदर

**मिरा** भाईंदर महापालिकेचे आयुक्त राधाबिनोद शर्मा आगीच्या घटनास्थळी उपस्थित न राहिल्याने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी त्यांना चांगलेच खडसावले. दहा मिनिटात घटनास्थळी पोहोचायचे'. 'माझ्यासमोर देखता हू वगैरे चालणार नाही', 'नीट बोलायचे अशा शब्दात सर्वांसमोर फोन करून सज्जड दम दिला. भाईंदरच्या इंद्रलोक येथे काल रात्री आग लागून तिघांचा मृत्यू झाला होता. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शनिवारी दुपारी घटनास्थळी भेट दिली. मात्र त्यावेळी मिरा-भाईंदर आयुक्त राधाबिनोद शर्मा उपस्थित नव्हते. त्यामुळे सरनाईक यांना संताप अनावर झाला आणि त्यांनी थेट माध्यमांसमोरच आयुक्तांना फोन केला. मंत्र्यांनी महापालिका आयुक्ताची वाट बघायची का? मंत्र्यांचा दौरा नियोजित होता मग त्यानुसार बैठक घ्यायची होती, असे सरनाईक म्हणाले. तेव्हा 'देखता हू' असं उत्तर आयुक्तांनी दिली. ते ऐकताच सरनाईक यांचा पारा चढला.

# फुलेंच्या जयंतीदिनी महाराष्ट्रातील पहिल्या सीबीएसई जिल्हा परिषद शाळेचे उद्घाटन

■ पुणे

**ज्योती** सावित्री जिल्हा परिषद शाळा या अत्याधुनिक मॉडेल स्कूलचे उद्घाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त करण्यात आले. ही महाराष्ट्रातील पहिली सीबीएसई संलग्नता प्राप्त जिल्हा परिषद शाळा ठरली आहे. वंचित आणि हुशार विद्यार्थ्यांसाठी अंगणवाडी ते इयत्ता १२ वी पर्यंतचे शिक्षण येथे मोफत दिले जाणार आहे. यावेळी भाषण करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलताना म्हणाले की, आजही मानसिकता बदलण्यासाठी महात्मा फुले यांच्या विचार अमलात आणायची गरज आहे.

सभागृहात एका बाजूला महिला आणि एका बाजूला पुरुष अशी बैठक व्यवस्था होती. याचा संदर्भ देत फडणवीस म्हणाले की, महात्मा फुले यांचे विचार आजही कालसुसंगत आहेत. मोदीजींनी महिलांना लोकसभेत आणि विधानसभेत ३० टक्के आरक्षण दिले आहे. छगन भुजबळ त्याबाबत बोलल्यावर केवळ महिलांच्या बाजूने टाळ्या वाजल्या. राजकीय क्षेत्रात आपली मानसिकता बदलण्यासाठी फुले यांच्या विचारांची गरज आहे. कार्यक्रमात बोलताना अन्न पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी आपल्या भाषणात लोकसभेत महिलांना ३० टक्के आरक्षण दिले जाणार असल्याचा संदर्भ दिला.

# स्वयंचलित दरवाजे असलेली भारताची पहिली नॉन-एसी लोकल मुंबईत येणार

■ मुंबई



**स्वयंचलित** दरवाजे असलेली भारतातील पहिली नॉन-एसी लोकल उद्यापर्यंत मुंबईत दाखल होणार आहे. भारतीय रेल्वेने हा निर्णय प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य देत घेतला आहे. मुंब्रा येथील दुर्घटनेनंतर ही लोकल विकसित करण्यात आली आहे. या घटनेत चालत्या गाडीतून प्रवासी पडल्याने ५ जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर सुरक्षेच्या दृष्टीने लोकलच्या डब्यांना स्वयंचलित दरवाजांची संकल्पना आणण्यात आली. ही लोकल सेवेत दाखल होण्यापूर्वी रिसर्च डिझाईन्स अँड स्टँडर्ड्स ऑर्गनायझेशनकडून विविध तांत्रिक चाचण्या घेतल्या जाणार आहेत. सर्व निकष पूर्ण झाल्यानंतरच प्रवासी सेवेसाठी परवानगी दिली जाईल. ही प्रक्रिया साधारण तीन महिने चालण्याची शक्यता आहे. या लोकलची रचना पूर्णपणे इंटरकनेक्टेड असून, वेगवेगळे डबे किंवा फर्स्ट क्लास विभाग ठेवलेला नाही. त्यामुळे प्रवाशांना संपूर्ण गाडीत मुक्तपणे फिरता येणार आहे आणि गर्दीचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. मुंबईतील प्रचंड गर्दी लक्षात घेऊन या गाडीत विशेष 'फोर्स्ड व्हेंटिलेशन सिस्टम' बसवण्यात आली आहे.

# मंत्री मंगलप्रभात लोढांविरोधात उबाठाचे करी रोड येथे आंदोलन

■ मुंबई

लोअर परळ येथील रेल्वे पुलाखालील मोकळ्या जागेवर खासगी संस्थेमार्फत ताबा मिळवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करत उबाठाने आज मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्याविरोधात करी रोड येथे आंदोलन केले. या आंदोलनात खासदार अरविंद सावंत सहभागी झाले होते. आंदोलकांनी लोढा हटाव, मुंबई बचाव अशा घोषणा देत निषेध नोंदवला. लोअर परळ उड्डाणपुलाखालील जागेत ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र, लहान मुलांसाठी बाग आणि तरुणांसाठी ओपन जिम उभारण्याचा प्रस्ताव उबाठाचे आमदार अजय चौधरी आणि पालिकेतील विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांनी पालिकेकडे सादर केला होता. या प्रस्तावासाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्याचेही त्यांनी सांगितले. मात्र, या जागेवर लोढा यांनी खासगी संस्थेमार्फत ताबा मिळवण्याचा प्रयत्न सुरू केल्याचा आरोप उबाठाकडून करण्यात आला. या आंदोलनावेळी अरविंद सावंत म्हणाले की, समाजामध्ये तेढ निर्माण करणारे मंत्री हे मंत्रिमंडळाला कलंक आहेत. अशा मंत्र्यांना आधी दूर केले पाहिजे.

# 'जियो पारसी' पोर्टल सुरू! बॉम्बे पारसी पंचायतीकडून समुदायाला मार्गदर्शन

■ मुंबई

**केंद्र** सरकारने 'जियो पारसी' योजनेला चालना देण्यासाठी १ एप्रिल रोजी सार्वत्रिक नोंदणी पोर्टल सुरू केल्यानंतर, समुदायातील सर्वात मोठी ट्रस्ट असलेल्या बॉम्बे पारसी पंचायतीने नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आणि पारसी समाजाला योजनेचे लाभ मिळवून देण्यासाठी सरकारसोबत समन्वय साधण्यास सुरुवात केली.

१ एप्रिल रोजी सुरू करण्यात आलेल्या या पोर्टलमुळे पारसी समाजात मोठा उत्साह निर्माण झाला आहे. मागील आठवड्यात बॉम्बे पारसी पंचायतीने बीपीपीने चर्नी रोड येथील बनाजी हॉलमध्ये कार्यशाळा आयोजित केली होती, त्यामध्ये ५०० हून अधिक लोकांनी सहभाग घेतला. या सत्रात नोंदणी प्रक्रिया समजावून सांगणे आणि पात्रता तसेच आवश्यक कागदपत्रांबाबतच्या शंका दूर करण्यात आल्या.

केंद्राच्या या उपक्रमाचे स्वागत करताना बॉम्बे पारसी पंचायतीचे विश्वस्त डॉ. आदिल मालिया म्हणाले की , आम्ही समाजाला या योजनेबद्दल माहिती देतो. आमच्या संस्थेवर लोकांचा विश्वास आहे. लोकांना 'जियो पारसी' आणि सरकार समाजाच्या संरक्षणासाठी काय करत आहे, हे समजायला हवे.'जियो पारसी' कार्यक्रमाचा उद्देश पारसी समाजाची घटती लोकसंख्या स्थिर ठेवणे आणि वाढवणे हा आहे.

# अनिल सावंत आज शिंदे गटात प्रवेश करणार

**पंढरपूर** - पश्चिम महाराष्ट्रात शरद पवार गटाला मोठा धक्का बसला. शरद पवार गटाचे नेते अनिल सावंत यांनी पक्षाला रामराम ठोकला आहे. ते उद्या शिंदे गटात प्रवेश करणार आहेत. पंढरपूरमध्ये होणाऱ्या शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्ता मेळाव्यात हा पक्षप्रवेश होणार असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सावंत धनुष्यबाण हाती घेणार आहेत. गेल्या काही दिवसांपासून ते नाराज असल्याची चर्चा होती. या प्रवेशामुळे पंढरपुरातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे.


## जाहीर सूचना

याद्वारे जनतेस सूचित करण्यात येते की, मी, अफाक हुसेन सिद्दीकी, फ्लॅट ८०२, सनफ्लॉवर इमारत, रिजन्सी गार्डन्स कोहौसो, सेक्टर ६, खारघर, पनवेल ४१०२१० हा फ्लॅट कौशल किशोर शर्मा आणि सौरभ श्रीवास्तव यांच्याकडून खरेदी करण्याचा मानस बाळगत आहे. जर कोणत्याही व्यक्ती/संस्था/संघटना/बँकेस वरील नमूद मालमत्तेबाबत विक्री, भेट, भाडेपट्टा, वारसा हक्क, ताबा, धारणाधिकार, कोणताही खटला किंवा इतर कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, शीर्षक, हितसंबंध किंवा दावा असल्यास, त्यांनी तो खाली नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात व संबंधित कागदपत्रांसह या सूचनेच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत कळवावा, अन्यथा असा दावा सोडून दिलेला व त्याग केलेला समजण्यात येईल. फ्लॅट २०४, सनफ्लॉवर इमारत, रिजन्सी गार्डन्स कोहौसो, सेक्टर ६, खारघर, पनवेल ४१०२१०.



## जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे **सूचना** देण्यात येते की, **जेजोशी इन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रा. लि.** प्रायव्हेट लिमिटेड कंपनी, नोंदणीकृत कार्यालय - ए/२९, प्रगती सोसायटी, मिरा सिनेमासमोर, कनकारिया, अहमदाबादः ३८००२९ यांनी आमच्या अशिलाकडे याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशिलवारपणे नमूद केलेल्या जागेच्या तारणाच्या बदल्यात कर्जाकरिता विचारणा केली आहे. जेजोशी इन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रा. लि. यांनी आमच्या अशिलास सूचित केले आहे की, त्यांनी सदर जागा सौ. निशा सतिश रायसिंघानी यांच्याकडून संपादित केली होती, ज्यांनी ती त्यांची बहिण सौ. नीलम राम छेलारामानी आणि सौ. रेणू अशोक झुरानी आणि सौ. किरन सुरेश टेकचंदानी आणि सौ. उषा हरीश सावलानी यांच्याकडून दिनांक ११ फेब्रुवारी, २००९ रोजीच्या नोंदणीकृत (बीडीआर-१-१२६१-२००९) भेट करारनाम्याअंतर्गत संपादित केली होती, ज्या सर्वांना ती त्यांची आई, कमला शेवासिंग मखिजानी यांच्याकडून कोणत्याही विशिष्ट दस्तऐवजांशिवाय वारसाहक्काने मिळाली होती.

स्वतंत्र व्यक्ती, हिंदू अविभक्त कुटुंब (एचयूएफ), कंपनी (कंपन्या), बँक(का), वित्तीय संस्था, नॉन-बँकिंग वित्तीय संस्था, फर्म(स), व्यक्तींची संघटना किंवा स्वतंत्र व्यक्तींचे स्थापित असलेले किंवा नसलेले मंडळ, सावकार आणि/किंवा धनको समाविष्ट असलेले परंतु त्यास मर्यादित नसलेल्या कोणा व्यक्ती/व्यक्तींचा/एन्टिटी/एन्टीटींचा याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मालमत्ता आणि/किंवा त्याच्या कोणत्याही भाग/तुकड्याच्या संदर्भात वारसा, विक्री, हस्तांतरण, हिस्सा, गहाणवट, तारण, प्रभार, वाटप, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, धारणाधिकार, परवाना, अभिहस्तांकन, भाडेकरू, भेट, हक्कसोड, देवाणघेवाण, बोजा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड/विभागणी, मृत्युपत्र, उत्तराधिकार, देखभाल, वहिवाट, न्यास, ताबा, कुटुंब, कायद्याच्या कोणत्याही न्यायालयाचा हुकूम किंवा आदेश, कंत्राट/करारपत्रे, भागिदारी, मार्गाचा अधिकार, प्रलंबित कायदेशीर कारवाई, आरक्षण, संपादन, कंत्राट/करारपत्र, सामंजस्य करार, विक्रीचा करार, मुखत्यार पत्र, पर्याय, वाटप, प्रथम नकाराचा अधिकार, पूर्व हस्तांतरण किंवा कोणतेही दायित्व किंवा कोणतीही वचनबद्धता या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही लाभ, शीर्षक, दावे, आक्षेप, मागण्या किंवा हक्क किंवा कशाही प्रकारे हितसंबंध असल्यास, त्यांनी त्याबाबत सहाय्यक दस्तऐवजांसह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून सात (७) दिवसांच्या आत निम्न उल्लेखित पत्त्यावर लेखी कळवावे, असे न केल्यास अशा व्यक्ती/एन्टिटी(टीं)चे हक्क, शीर्षक, दावे, आक्षेप, लाभ, अधिकार, मागण्या आणि/किंवा हितसंबंध जाणूनबुजून आणि स्वेच्छेने सोडून दिले किंवा त्याग करण्यात आले.

वरील उल्लेखित मालमत्तेची अनुसूचीः

प्लॉट क्र. २०ए, एस. व्ही. रोड, वांद्रे (प), मुंबई - ४०० ०५० येथे स्थित हायपिक को-ऑप. हौ. सोसा. लि.च्या हाय पिक अपार्टमेन्ट या इमारतीमधील ३ ऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. ३-ए, मोजमाप ८०० चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ आणि हायपिक सीएचएसएल च्या भाग प्रमाणपत्र क्र. ९ अंतर्गत डिस्टिंक्टिव्ह क्र. ४१ ते ४५ धारण केलेले पाच समभाग.

दिनांक १२ एप्रिल, २०२६ सही/-
बिलावाला ॲण्ड कं.
गहाणवटदारांकरिता ॲडव्होकेट्स आणि सॉलिसिटर्स
करीम चेंबर्स, २ रा मजला, अंबालाल दोशी मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ०२३.

रामेश्वर मीडिया



## पश्चिम रेल्वे

### संचालनासाठी संमती प्राप्त करणे

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (रोलिंग स्टॉक), ईएमयू कारशेड, मुंबई मध्य विभाग, पश्चिम रेल्वे, मुंबई ४०००३४ हे **ई-निविदा क्र.: डीआरएम/आरएस/२०२४-२५/२३(आर) (ईएनएचएम), दि.०७.०४.२०२६** आमंत्रित करीत आहेत. **कामाचे नाव:** मुंबई सेंट्रल आणि कांदिवली येथील ईएमयू कारशेडसाठी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संचालन संमती (सीटीओ) प्राप्त करण्याबाबतचा प्रस्ताव. **कामाचा अंदाजित खर्च:** रु.८,२१,२८०/- **इरठे :** रु.१६,४००/- **सादर करण्याची दिनांक व वेळ:** ०४.०५.२०२६ पर्यंत, १५.०० वा. **उघडण्याची दिनांक व वेळ:** ०४.०५.२०२६ रोजी, १५.३० वा. अधिक माहितीसाठी कृपया आमच्या www.ireps.gov.in वेबसाइटला भेट द्या. 1297

आम्हाला लाईक करा facebook.com/WesternRly



## कामगारांसाठी जाहीर सूचना / नोटीस

या जाहीराती द्वारे कळविण्यात येते की, **मे. ठाकूर एअरकंडीशनिंग कं.** प्लॉट नंबर सीटीएस २५४ (पार्ट), लेन नेक्स्ट टू यू एस व्ही लिमिटेड, ऑफ बी.एस. देवशी मार्ग, गोवंडी (पूर्व), मुंबई - ४०००८८ या आस्थापनेच्या जागेचे एकूण क्षेत्रफळ १७७१ चौ.मी. आहे.
सदर जमिनीवर मे. ठाकूर एअरकंडीशनिंग कं. यांचा औद्योगिक कारखाना होता.
सदरहू कारखाना सप्टेंबर २००९ मध्ये मंदी असल्यामुळे बंद करण्यात आलेला आहे.
तथापि, सदर जागेचा विकास / विक्री / हस्तांतरण करावयाचे आहे.
त्यामुळे या आस्थापनेत पूर्वी काम केलेल्या सर्व कायम कामगार/कर्मचारी/तात्पुरते/कंत्राटी तसेच प्रशिक्षणार्थी व कामगारांची व त्यांच्या संघटनांची कामगारांच्या कायदेशीर देणी बाबत, विवादासंदर्भात दावे / तक्रारी असल्यास संबंधितांनी लेखी तक्रार कागदपत्रांच्या पुराव्यासहित मा. कामगार उप आयुक्त, मुंबई उपनगर, कामगार आयुक्त यांचे कार्यालय कामगार भवन पहिला मजला, सी-२०, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०००५१. यांच्याकडे अथवा मे. ठाकूर एअरकंडीशनिंग कं. प्लॉट नंबर सीटीएस २५४ (पार्ट), लेन नेक्स्ट टू यू एस व्ही लिमिटेड, ऑफ बी.एस. देवशी मार्ग, गोवंडी (पूर्व), मुंबई - ४०००८८ यांच्याकडे जाहीर नोटीस / सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत सादर करावी. या कालावधीनंतर दाखल केलेली तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही व अशा दाव्यांची दखल न घेता ते अशा व्यक्ती / कामगार व कामगारांचे वारसदार यांनी आपले हक्क सोडले आहेत व ते आमच्यावर बंधनकारक नाहीत असे समजून आम्ही पुढील कारवाई करू याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

मे. ठाकूर एअरकंडीशनिंग कं.

सही /-
मे. ठाकूर एअरकंडीशनिंग कं.
तर्फे
श्री मिलिंद रवींद्र ठाकूर
(भागीदार)

स्थळ : मुंबई उपनगर
दिनांक : ११.०४.२०२६


# कुलाब्यातील सीपीआरए ग्रीन्स नार्वेकर व रहिवाशांत वाद

■ मुंबई

**कुलाबा** येथील प्रकाश पेठे मार्गावरील 'सीपीआरए ग्रीन्स' या बागेच्या ताब्यावरून कफ परेड रेसिडेंट्स असोसिएशन ही रहिवाशी संघटना आणि भाजपाचे नगरसेवक मकरंद नार्वेकर यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. सीपीआरएचा आरोप आहे की, गुरुवारी पालिका अधिकारी आणि नार्वेकर यांच्या नेतृत्वाखाली सुमारे १०० जणांनी कोणतीही पूर्वसूचना न देता बागेत जबरदस्तीने प्रवेश केला आणि धाकदपटशा केली. या गटाने हातोड्यांच्या साहाय्याने कुलूप तोडून प्रवेश केला . बाग व्यवस्थापकावर हल्ला केला.

सीपीआरएचे म्हणणे आहे की, ही बाग स्थानिक रहिवाशांनी पाच दशकांहून अधिक काळ सांभाळली असून अतिक्रमण टाळण्यासाठी दिलेल्या ओसाड जागेत झाडे लावून बाग तयार केली आहे. मात्र पालिकेच्या मते २०१५ मध्ये सीपीआरएची मुदत संपल्यानंतर पालिकेने ताबा घेतला आला. सीपीआरएच्या अध्यक्षा लॉरा डिसुझा यांनी आरोप केला की, नगरसेवक नार्वेकर यांनी कुलूप तोडून जबरदस्तीने प्रवेश केला, व्यवस्थापकाला मारहाण केली. त्याचा फोन हिसकावून फोटो डिलीट केले आणि धमक्या दिल्या. ते सुमारे १०० लोकांसह आले होते, ज्यांच्याकडे हातोडे आणि विळे होते.


## मध्य रेल्वे

### जाहीर अधिसूचना

मध्य रेल्वेच्या खाली नमूद केलेल्या विभागाच्या पूर्ण झालेल्या टप्प्यावर स्थित रेल्वे मार्ग आणि परिसरातील सर्व वापरकर्त्यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, २५,००० व्होल्टची ५० एचझेड एसी ओव्हरहेड ट्रॅक्शन तार, संबंधित विभागासमोर नमूद केलेल्या तारखेला किंवा त्यानंतर विद्युतप्रवाहित केली जाईल. त्याच तारखेपासून ओव्हरहेड ट्रॅक्शन लाईन सर्वकाळ चालू मानली जाईल आणि कोणत्याही अनधिकृत व्यक्तीने सदर ओव्हरहेड लाईनजवळ जाऊ नये किंवा तिच्या परिसरात काम करू नये.

| विभाग | विद्युत प्रवाहाची तारीख |
|---|---|
| मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातील कल्याण – कसारा विभागात, मंजूर कल्याण – कसारा ३री लाईन प्रकल्पांतर्गत, कि.मी. १०१/०७-१२ येथे थानसिट येथील सब-सेक्शनिंग व पॅरॅलिंग पोस्टचे २५ केव्ही एसी पुरवठ्यावर ऊर्जीकरण. | ०९.०५.२०२६ |

AK-44

सुरक्षित प्रवास करा; फूटबोर्डवर प्रवास करणे टाळा.



## महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

### विज बंदबाबत जाहीर निवेदन

कल्याण पश्चिम विभागातील सर्व विज ग्राहकांना कळविण्यात येते की, २२ केव्ही वलीपीर उपकेंद्रातुन निघणाऱ्या **२२ केव्ही पत्रीपुल** या वाहिनीवर देखभाल व दुरूस्तीच्या कामासाठी **दि. १३.०४.२०२६ रोजी सकाळी १०.०० ते १५.०० वाजेपर्यत** खाली नमुद केलेल्या भागाचा विज पुरवठा बंद राहील याची कृपया नोंद घ्यावी. ग्राहकांच्या होणाऱ्या गैरसोईबद्दल महावितरण कंपनी दिलगीर आहे.

| अनु. क्र. | उपकेंद्र | फिडर | भागाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | २२ केव्ही वलीपीर | पत्रीपुल | मोहल्ला, जे.पी. रिसॉर्ट, मच्छी मार्केट, एपीएमसी मार्केट, सर्वोदय सागर, भोईवाडा, गोवंडी मोहल्ला, आदेश्वर पार्क, फोर्टिस हॉस्पिटल, एरिसिया अल्टीस, सनई मंगल, चार्म स्टार, सर्वोदय मॉल, सूर्यमुखी, चंद्रमुखी, सर्वोदय सृष्टी, सर्वोदय रेसिडेन्सी, रहेजा कॉम्पलेक्स, लोक उद्यान, सर्वोदय गार्डन, सर्वोदय पॅराडाईस, सांगळे वाडी, कल्याण नगरी. |

कार्यकारी अभियंता, कल्याण पश्चिम विभाग



## जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे **सूचना** देण्यात येते की, आमचे अशील याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेली निवासी मालमत्ता **सौ. स्मिता अक्षय वकील आणि श्री. अक्षय व्ही. वकील** यांच्याकडून खरेदी करण्यात इच्छुक आहेत कोणा व्यक्ती/व्यक्तींचा/बॉडी कॉर्पोरेट/वित्तीय संस्था/शासन यांचा अनुसूचीमधील जागा किंवा तिच्या कोणत्याही भागाविरुद्ध विक्री, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, हिस्सा, हस्तांतरण, विकास, आदेश, वितरण, लिव्ह ॲण्ड लायसन्स, प्रभार, धारणाधिकार, प्रलंबित कायदेशीर कारवाई, निवाडा/हुकूम, वारसा, गहाणवट, भेट, योजना, देवाणघेवाण, न्यास, मृत्युपत्र, देखभाल, भाडेकरू, पोट-भाडेकरू, वहिवाट, ताबा, भोगवटा, बोजा, करारपत्र, अभिहस्तांकन करारनामा या मार्गे कोणताही दावा/आक्षेप असल्यास किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही हितसंबंध असल्यास, त्यांना याद्वारे विनंती करण्यात येते की, त्याबाबत त्याच्या संबंधातील सहाय्यक कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना ॲडव्होकेट यांच्या **मे. चिराग शाह ॲण्ड कं.**, ॲडव्होकेट्स ॲण्ड सॉलिसिटर्स, कार्यालय क्र. ६०५, ६वा मजला, पर्ल प्लाझा, मॅक डोनाल्ड्सजवळ, रेल्वे स्टेशनसमोर, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५८, दूरध्वनीः +९१ ८८९८०५००५१ आणि ई-मेल आयडीः info@advocateshah.com येथील कार्यालयात सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीमध्ये सूचित करावे, असे न केल्यास, जागेचे शीर्षक स्पष्ट आणि सर्व बोज्यांपासून मुक्त असल्याचे मानण्यात येईल आणि असे समजण्यात येईल की, त्यावर कोणतेही दावे/आक्षेप नाहीत आणि/किंवा ते सोडून दिले/त्याग केले आणि आमच्या अशिलावर बंधनकारक नसतील.

वरील उल्लेखित अनुसूची

मुंबई उपनगर जिल्ह्याच्या नोंदणीकरण कार्यक्षेत्रामध्ये आणि सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०० ०५५ येथे वसलेल्या असलेल्या, गाव वांद्रे, तालुका अंधेरीचा भूखंड क्र. ४६ टी.पी.एस. III, सीटीएस क्र. I/२४३, २४३/१ ते २४३/३ धारण केलेल्या जमिनीच्या खंडावर उभ्या "दि ओम जय को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड" च्या "जया कुटीर" असेही ओळखल्या जाणाऱ्या "परमार प्लॅटिनम" या इमारतीमधील ३ऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. ३०२, मोजमाप ३८० चौ. फू. रेरा कार्पेट क्षेत्रफळ (समतूल्य ३५.३० चौ.मीटर्स कार्पेट क्षेत्रफळ) व त्यासह एक कार पार्किंग जागा आणि सदर संस्थेद्वारे पारित भाग प्रमाणपत्र क्र. २० अंतर्गत समाविष्ट असलेले डिस्टिंक्टिव्ह क्र. ५६ ते ६० (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. ५०/- प्रत्येकीचे ५ (पाच) पूर्णतः भरणा केलेले समभाग.

दिनांक १२ एप्रिल, २०२६ सही/-
चिराग शाह ॲण्ड कं. करिता
ॲडव्होकेट्स ॲण्ड सॉलिसिटर्स
www.advocateshah.com



## मध्य रेल्वे

### सामग्री व्यवस्थापन विभाग

### ई-निविदा सूचना क्र. एनआयटी/०१/२६/१८ दिनांक ०९-एप्रिल-२६

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, मध्य रेल्वेचे प्रधान मुख्य सामग्री व्यवस्थापक खालील वस्तूंच्या पुरवठ्यासाठी ई-निविदा आमंत्रित करीत आहेत:

| निविदा क्र. | तपशिल | प्रमाण | देय दिनांक |
|---|---|---|---|
| ७१२६५००५ | डॉ.बी.ए.एम. रुग्णालय, भायखळा येथील ईएनटी विभागासाठी शस्त्रक्रिया ड्रिलिंग आणि कटिंग प्रणालीची खरेदी. | ०१ नग | ०६ मे २६ |
| २७२६३६७३ए | अंतिम फ्रेम - नॉन-ड्राइव्ह बाजूची जुळणी | ७४ नग | ३० एप्रिल २६ |
| ७५२६१०२८ | रेल्वे डब्यांच्या बाह्य फिनिशिंगसाठी कृत्रिम एनॅमल पेंट - रंग: काळा. | १,११,८२० लिटर | ११ मे २६ |
| ४२२६१३८७ | व्हॉल्व्हचा संच | ११२३ संच | ०१ मे २६ |
| ३८२६१८५९ए | नॉन-ॲसबेस्टोस आधारित सेंद्रिय ब्रेक पॅड, एकूण ४०० चौ. से.मी. आणि ३५ मि.मी. जाडीचे, दोन भागांमध्ये (एक उजवा व एक डावा) प्रत्येकी २०० चौ.सेमी., एलएचबी कोचेससाठी, आरडीएसओ तपशील क्र. आरडीएसओ/२०१३/सीजी-०१, रेव्ह.-०१, एप्रिल २०२३ नुसार. %ए० | ४६१०३ संच | ३० एप्रिल २६ |
| ३८२६३४९७ए | नॉन-एसी कोचेससाठी फिएट बोगीसह सेकंडरी व्हर्टिकल डॅम्पर, आरडीएसओ ड्रॉइंग क्र. आरडीएसओ/डीआरजी/२१०१८, बदल क्र. ३ नुसार आणि आरडीएसओ तपशील क्र. आरडीएसओ/सीजी-१८००५, सुधारणा क्र. २ तसेच ऑक्टोबर २०२५ च्या दुरुस्ती क्र. १ अन्वये. | २१९५ नग | ३० एप्रिल २६ |
| ४३२६११४५ | २५ किलोवॅट अल्टरनेटरसाठी इलेक्ट्रॉनिक रेक्टिफायर कम रेग्युलेटिंग युनिट (ईआरआरयू) | २१ नग | ०४ मे २६ |
| ७५२६५०३८ | लवचिक पॉलीव्हिनाइल क्लोराइड (पीव्हीसी) फ्लोअरिंग शीट | ३०० नग | ११ मे २६ |

टीप: वरील सर्व निविदा ई-निविदा असून सर्व निविदादारांना विनंती करण्यात येते की त्यांनी आपले बोली आयआरईपीएसच्या https://www.ireps.gov.in वेबसाईटवर ऑनलाईन सादर करावे. वरील नमूद केलेल्या निविदांबाबत तसेच इतर पुरवठा निविदांबाबत अधिक माहितीसाठी कृपया आयआरईपीएसच्या वेबसाईटला भेट द्यावी.

AK-39 प्रधान मुख्य सामग्री व्यवस्थापक

सुरक्षित प्रवास करा; फूटबोर्डवर प्रवास करणे टाळा.

नवाकाळ
Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial

# विद्यार्थ्याचा नोंदणीप्रवेश अर्ज सादर न करणे महागात पडले

## सोमाणी कॉलेजला २५ हजारांचा दंड

■ मुंबई

**मुंबई** विद्यापीठाच्या परिपत्रकाचे पालन न केल्याबद्दल आणि जून २०२२ मध्ये विद्यार्थ्याचा 'नोंदणी अर्ज' सादर करून न घेताच त्याला प्रवेश दिल्याबद्दल गिरगाव चौपाटी येथील हजारीमल सोमानी कॉलेजला उच्च न्यायालयाने दणका दिला. याचवेळी कॉलेजला निष्काळजीपणाबद्दल २५ हजार रुपयांचा दंड, तर नोंदणी अर्ज सादर करण्यासंबंधी सूचनेचे पालन न केल्याबद्दल विद्यार्थ्याला १५ हजार रुपयांचा दंड ठोठावला. कॉलेज आणि विद्यार्थ्याने एकत्रितरित्या ४० हजार रुपयांची रक्कम मुंबई विद्यापीठाकडे भरावी, असे आदेश न्यायमूर्ती रियाझ छागला आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने दिले.

पाचव्या सत्राच्या परीक्षेचे प्रवेशपत्र (हॉल तिकीट) न मिळाल्यानंतर विद्यार्थ्याने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्याच्यावतीने ॲड. राहुल कदम यांनी याचिका दाखल केली. याचिकेवर न्यायमूर्ती रियाझ छागला आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. विद्यार्थ्याच्या चुकून झालेल्या दुर्लक्षामुळे, वैयक्तिक आणीबाणीमुळे आणि अंतिम मुदतीबाबत झालेल्या गोंधळामुळे विद्यार्थ्याकडून अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखा हुकल्या.

# भांडुपमध्ये गॅलरी कोसळली ७५ वर्षीय वृद्धाचा मृत्यू

■ मुंबई

**भांडूप** (पश्चिम) येथील तुळशीपाडा परिसरात घराची गॅलरी कोसळून शिवसाई (सुसाई) देवदास कौंडर या ७५ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाला. ही घटना आज सकाळी ९.४५ वाजताच्या सुमारास पाटकर कंपाऊंडमध्ये घडली. तळमजला अधिक एक मजली इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील गॅलरीचा काही भाग अचानक कोसळला. गॅलरीच्या फरशीला आधार देणारे लोखंडी अँगल तुटल्याने हा प्रकार घडल्याचे सांगितले जात आहे. या दुर्घटनेत शिवसाई हे गंभीर जखमी झाले होते.

# आता सिंधी भाषेतही संविधान! राजधानी दिल्लीत प्रकाशन

■ उल्हासनगर

**भारताचे** उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी नवी दिल्लीत सिंधी भाषेतील संविधानाची नवीन आवृती प्रकाशित केली. ही आवृत्ती देवनागरी आणि फारसी या दोन्ही लिपीमध्ये उपलब्ध आहे. सिंधी समूदाय आणि भाषिक विविधता जपण्याच्या उद्देशाने हे प्रकाशन करण्यात आले असून, हे संविधानाचे सिंधी भाषेतील अधिकृत रुप आहे.

दिल्लीतील उपराष्ट्रपती भवनात सिंधी भाषा दिनाचे औचित्य साधून संविधानाच्या सिंधी भाषांतरीत




आवृत्तीचे प्रकाशन उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बोलताना राधाकृष्णन म्हणाले की, सिंधी ही सर्वात जुन्या आणि मधुर भाषांपैकी एक आहे. भारताच्या स्वातंत्र्यानंतर प्रथमच देवनागरी लिपीतील भारतीय संविधानाच्या सिंधी आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले आहे. प्रत्येक नागरिक, भाषेचा विचार न करता, देशाच्या आदर्शांना पूर्णपणे समजू शकेल आणि त्यांच्याशी जोडला जाऊ शकेल, हे सुनिश्चित करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या विशेष कार्यक्रमाला सिंधी समाजाचे प्रतिनिधी म्हणुन उल्हासनगरचे आमदार कुमार आयलानी,केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल, राजस्थान विधानसभा अध्यक्ष वासुदेव देवनानी, माजी आमदार गुरमुख जगवानी,राजू मनवानी यांच्यासह देशभरातील सिंधी समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन खासदार शंकर लालवानी यांनी केले होते.

# परळगावात आज श्री वाघेश्वरी देवीचा ६९ वा जत्रौत्सव

■ मुंबई

**परळगावातील** श्री वाघेश्वरी देवी मंदिर ट्रस्टतर्फे वार्षिक सुक्त शांती होमहवन व जत्रोत्सव २०२६ चे आयोजन उद्या १२ एप्रिल रोजी करण्यात आले आहे. यंदा या उत्सवाचे ६९ वे वर्ष आहे.

मुकुंद अण्णा जाधव मार्ग, परळगाव येथे होणाऱ्या या धार्मिक सोहळ्यात सर्व ज्ञातीबंधू-भगिनी व भक्तगणांनी सकाळी ८.३० ते रात्री ८.३० या वेळेत दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे. तसेच, दुपारी १२ ते ३ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी सर्व भक्तांना सस्नेह निमंत्रण देण्यात आले असून, पुढील वर्षाच्या पूजेच्या यजमानपदासाठी इच्छुक भाविकांनी ट्रस्टशी संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# आता राज्यात ट्रक चालविताना क्लिनरची आवश्यकता नाही

## 'ड्रायव्हर असिस्ट सिस्टिम' बंधनकारक राहणार

■ मुंबई

**राज्य** सरकारने आता अवजड मालवाहतूक वाहनांसाठी क्लिनर किंवा मदतनीस ठेवण्याची सक्ती रद्द केली आहे. ३६०- अंशांचा कॅमेरा आणि 'ड्रायव्हर असिस्ट सिस्टिम' असलेल्या आधुनिक सुविधेच्या ट्रकना आता क्लिनरशिवाय प्रवास करण्याची परवानगी असेल.

या निर्णयामुळे वाहनधारकांना दंडातून मोठा दिलासा मिळाला आहे. हा निर्णय ट्रक चालक व मालवाहतूकदार संघटनांच्या मागणीनुसार घेण्यात आला आहे.

'मोटार वाहन कायदा, १९८८' अंतर्गत ८ एप्रिल रोजी यासंदर्भातील



राजपत्र प्रसिद्ध करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र मोटार वाहन (पहिली सुधारणा) नियम, २०२६' नुसार, जर जड वाहनांमध्ये 'ड्रायव्हर असिस्ट सिस्टिम' बसवलेली असेल,तर क्लीनरची आवश्यकता भासणार नाही. या प्रणालीत ३६०-डिग्री कॅमेरा, ब्लाइंड-स्पॉट मॉनिटरिंग आणि ऑडिओ-व्हिज्युअल प्रॉक्सिमिटी अलर्ट यांसारख्या आधुनिक सुविधांचा समावेश असणे आवश्यक आहे.

आतापर्यंत क्लीनर नसल्यास दररोज १,५०० रुपये दंड आकारला जात असे. एकाच प्रवासात अनेकवेळा दंड भरावा लागत असल्याने ट्रान्सपोर्ट क्षेत्रातून यावर तीव्र टीका होत होती.

# सोलापूरमध्ये विनापरवाना पुतळा उभारल्यास गुन्हा दाखल होणार

## पोलीस पाटलाचे ७ दिवसांत निलंबन

■ सोलापूर

**सोलापूर** जिल्ह्यात विनापरवाना पुतळा उभारल्यास संबंधितांवर थेट एफआयआर दाखल करून ४ तासांच्या आत पुतळा हटवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. तसेच अशा पुतळ्याची माहिती लपवल्यास संबंधित पोलीस पाटलाचे ७ दिवसांत निलंबन करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

या संदर्भात जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संयुक्त परिपत्रक जारी केले आहे. घटनेची पूर्वकल्पना प्रशासनाला न दिल्यास ग्रामपंचायत सदस्यांविरोधात अपात्रतेचा प्रस्तावही सादर केला जाणार आहे. मागील महिन्यात जिल्ह्यात विनापरवाना उभारण्यात आलेल्या पुतळ्यांच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने ही कडक भूमिका घेतली आहे.

कोणत्याही महापुरुषाचा पुतळा उभारण्यासाठी प्रशासनाने ९ अटी व नियम निश्चित केले आहेत. यामध्ये जागेच्या मालकीचे पुरावे, ग्रामपंचायत किंवा नगरपंचायतीचा ठराव, पोलिसांचा अहवाल, कला संचलनालयाचा अहवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र आदी कागदपत्रांचा समावेश आहे.



मोनोरेल लवकरच मुंबईकरांच्या सेवेत दाखल होणार आहे. सध्या नायगांव मोनो स्टेशन येथे तिची ट्रायल रन सुरू आहे. (छाया: दीपक साळवी)

# महिला व बाल विकास विभागात ८ हजारांहून अधिक पदे भरणार



■ मुंबई

**राज्यातील** महिला व बाल विकास विभागात तब्बल २३ वर्षांनंतर मोठी भरती प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विभागामध्ये एकूण ८ हजार ६६९ नियमित पदे भरण्यास मंजुरी देण्यात आली असून, यासोबतच बाह्ययंत्रणेद्वारे २ हजार ८४३ पदे आणि अंगणवाडी सेविका व मदतनीसांची २ लाख २१ हजार ३२८ पदेही मान्य करण्यात आली आहेत. या निर्णयाची माहिती महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले की, विभागाच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी आणि सेवा अधिक परिणामकारक करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. विभागातील एकूण पदांचा सविस्तर आढावा घेतल्यानंतर काही पदे रद्द करण्यात आली, तर १६५ नव्या पदांची निर्मिती करण्यात आली. त्यानंतर सुधारित संरचनेनुसार ८,६९९ नियमित पदांना मंजुरी देण्यात आली आहे. याशिवाय, विभागाच्या विविध योजनांची अंमलबजावणी अधिक सक्षम करण्यासाठी २,८४३ पदे बाह्ययंत्रणेमार्फत भरण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार १ लाख १० हजार ६६४ अंगणवाडी सेविका आणि १ लाख १० हजार ६६४ अंगणवाडी मदतनीस अशी एकूण २ लाख २१ हजार ३२८ मानधनाधारित पदे मंजूर करण्यात आली आहेत.

# ईडीकडून भोंदू खरातची ३ बँक खाती सील

■ नाशिक-

**ईडीने** भोंदू अशोक खरात आणि पत्नी कल्पना खरातच्या नावावरील तीन बँक खाती गोठवली. या खात्यांतील ३ वर्षांतील व्यवहारांची चौकशी सुरू आहे.

खरातविरुद्ध मनी लॉंड्रिंगचा गुन्हा दाखल केला असून, नाशिकसह पुणे, मुंबई आणि अहिल्यानगरमधील आर्थिक व्यवहारांची तपासणी सुरू आहे. कोट्यवधी रुपयांचे संशयास्पद व्यवहार समोर आल्याने पुढील काळात मालमत्तांवरही कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, खरात हे स्वतःला अधिकारी असल्याचे भासवून लोकांना ईडी व आयकर विभागाच्या कारवाईची भीती दाखवत पैसे उकळत असल्याचा संशय आहे. एसआयटीच्या चौकशीत त्याने मी इथून बाहेर पडेल असे वाटत नाही, माझे मरण इथेच असल्याचे वक्तव्य केल्याची माहिती आहे.

# थकित रकमेच्या थेट वसुलीचा अधिकार कामगार संघटनेला नाही

## उच्च न्यायालयाचा निकाल

■ मुंबई

**कंपनीकडे** थकीत असलेली रक्कम वसूल करण्याचा कामगार संघटनेला थेट अधिकार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिला. कामगार संघटना स्वतःच्या नावाने आणि कामगारांच्या लेखी अधिकाराशिवाय थकीत रकमेच्या वसुलीसाठी न्यायालयात अर्ज करू शकत नाही, असे न्यायालयाने म्हटले. न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या एकलपीठाने हा निर्णय दिला.

'विद्युत मेटालिक्स एम्प्लॉईज युनियन' आणि 'विद्युत मेटालिक्स प्रायव्हेट लिमिटेड' यांच्यात २००६ मध्ये करार झाला होता. या करारांतर्गत दिवाळीपूर्वी बोनस देणे आणि प्रत्येक कामगाराकडून ३२० रुपये कापून ते युनियनला देणे बंधनकारक होते. कंपनीने बोनस दिला. मात्र युनियनचे पैसे कापूनही त्यांना दिले नाहीत. औद्योगिक न्यायालयाने २०१३ मध्ये कंपनीला हे पैसे देण्याचे आदेश दिले होते. परंतु कंपनीने त्याचे पालन केले नाही. त्या विरोधात 'विद्युत मेटालिक्स एम्प्लॉईज युनियन'ने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्या याचिकेवर न्यायमूर्ती बोरकर यांच्या एकलपीठाने सविस्तर सुनावणी घेतली. थकीत रक्कम वसूल करण्यासाठी युनियनने 'एमआरटीयू आणि पीयुएलपी' कायद्याच्या कलम ५० अंतर्गत वसुलीचा अर्ज दाखल केला होता. औद्योगिक न्यायालयाने तो अर्ज फेटाळला होता. या संदर्भात दाद मागणाऱ्या युनियनचा युक्तिवाद न्यायमूर्ती अमित बोरकर यांनी अमान्य केला.

# ओशिवरातील सिटी इंटरनॅशनल स्कूलमध्ये पालकांचा गोंधळ

■ मुंबई

**ओशिवरा** येथील सिटी इंटरनॅशनल शाळा प्रशासन विद्यार्थ्यांचे शाळा सोडल्याचे दाखले, मागील निकाल आणि २०२६ चे प्रगतीपुस्तक देण्यास टाळाटाळ करत असल्याचा आरोप करत संतप्त पालकांनी शाळेत गोंधळ घातला. या प्रकरणी पालकांनी मनसेचे विभाग अध्यक्ष संदेश देसाई यांच्याकडे धाव घेतली. त्यानंतर संदेश देसाई आणि शाखाध्यक्ष लक्ष्मण वाघमोडे यांनी कार्यकर्त्यांसह शाळेत धडक दिली. विद्यार्थ्यांच्या हक्काची कागदपत्रे देण्यास टाळाटाळ करणाऱ्या प्रशासनाला मनसे शैलीत जाब विचारला. शाळेच्या अडवणुकीमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष धोक्यात येत असल्याने पालकांमध्ये तीव्र संताप होता. मनसेच्या आक्रमक भूमिकेनंतर अखेर शाळा प्रशासनाला माघार घ्यावी लागली.

# भाईंदरच्या इंद्रलोक भागात बांगलादेशचा झेंडा फडकविल्याचा मनसेचा आरोप

■ भाईंदर

**भाईंदरच्या** इंद्रलोक परिसरातील अनधिकृत वसाहती बेकायदेशीर माती भराव करून तसेच तिवरांच्या झाडांची कत्तल करून उभारण्यात आल्या आहेत. या प्रकरणी ११ जमीनमालकांविरोधात गुन्हे दाखल करून त्यावर कुठलीही ठोस कारवाई करण्यात आली नव्हती. या भागात बांगलादेशाचा झेंडा फडकवला जात होता, असा आरोप मनसेने केला आहे.

भाईंदरच्या इंद्रलोक येथील आगीत तीन जणांचा मृत्यू झाला. खासगी आणि सरकारी जागेवर बेकायदेशीरपणे भराव करून झोपडपट्ट्या उभारण्यात आल्या होत्या. तेथे झोपड्यांव्यतिरिक्त भंगाराची दुकाने तयार झाली होती. सदर ठिकाणी कांदळवन क्षेत्राचा ऱ्हास व अनधिकृत भरणी प्रकरणी २०२४ मध्ये नवघर पोलीस ठाण्यात ११ जणांविरोधात पर्यावरण संरक्षण अधिनियमाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. येथील बेकायदेशीर वसाहतींबाबत पालिकेकडे तक्रारी करण्यात आल्या होत्या. मात्र त्यावर काहीच कारवाई झालेली नाही. विशेष म्हणजे या परिसरात हाकेच्या अंतरावर पोलीस चौकी आहे. तरीदेखील बेकायदेशीर बांधकामे सुरू होती. या परिसरात मोठ्या प्रमाणात बांगलादेशी नागरिक बेकायदेशीपणे राहत आहेत. त्यांच्या घरावर बांगलादेशाचा झेंडा फडकवला जात होता, असा आरोप मनसेने केला आहे.

# दत्तसंप्रदायातील ज्येष्ठ साधक प्रकाश देसाई बुवा अनंतात विलीन

■ मुंबई

**गिरगाव** परिसरातील मुगभाट येथील रहिवासी तसेच दत्तसंप्रदायातील पूज्य व्यक्तिमत्त्व प्रकाश देसाई बुवा यांना ३० मार्च रोजी देवाज्ञा (निधन) झाली. त्यांच्या निधनाने भक्तवर्ग व परिसरात शोककळा पसरली आहे.

प्रकाश देसाई बुवा यांच्यावर दत्त महाराजांची विशेष कृपा असल्याची श्रद्धा भक्तांमध्ये होती. वयाच्या ३० व्या वर्षी त्यांनी संसाराचा त्याग करून कर्नाटकातील श्रीक्षेत्र गाणगापूर येथे प्रस्थान केले. तेथे त्यांनी तब्बल ४८ वर्षे कठोर साधना केली. या काळात अनेक संकटांना सामोरे जात त्यांनी न डगमगता आपली साधना पूर्ण केली. विशेष म्हणजे त्यांनी १३ वर्षे मौनव्रत धारण केले होते. त्यांच्या या तपश्चर्येचे फलस्वरूप म्हणून त्यांच्यावर दत्त महाराजांची कृपा झाल्याचे मानले जाते. गाणगापूर येथील संगमावर असलेल्या दत्त मंदिराच्या जीर्णोद्धारातही त्यांचे मोलाचे योगदान होते. देसाई बुवा माधुकरी मागूनच आपला उदरनिर्वाह करत असत आणि त्यालाच त्यांनी आयुष्यभराचा नियम बनवला होता. त्यांच्या साध्या स्वभावामुळे ते भक्तांमध्ये आदराचे स्थान राखून होते.

# 'खो-गो'ला 'मोस्ट पॉप्युलर ब्रँड' पुरस्कार! रेडकर कुटुंबाचा गौरव

■ मुंबई

**अर्थसंकेत** प्रस्तुत 'महाराष्ट्राचा लोकप्रिय ब्रँड २०२६ ' या प्रतिष्ठित सोहळ्यात 'खो-गो' या पारंपरिक आयुर्वेदिक ब्रँडची 'मोस्ट पॉप्युलर ब्रँड' म्हणून निवड करण्यात आली. सार्वजनिक मतदान प्रक्रियेतून लोकांनी दिलेल्या पसंतीच्या आधारे हा सन्मान जाहीर करण्यात आला.

मुंबईत पार पडलेल्या या भव्य कार्यक्रमात पोस्टकार्ड मॅन ऑफ इंडिया प्रदीप लोखंडे आणि अर्थसंकेतचे संस्थापक डॉ. अमित बागवे यांच्या हस्ते 'खो-गो'चे मुरलीधर रेडकर यांचा गौरव करण्यात






आला. यावेळी उर्वेश रेडकर आणि सहकारी श्रेयस कडुलकर उपस्थित होते. १९६१ मध्ये गिरगावातून सुरू झालेल्या 'खो-गो' गोळ्यांनी कमी किमतीत प्रभावी उपाय म्हणून लोकांचा विश्वास जिंकला.

जाहिरातींमुळे हा ब्रँड ग्रामीण भागातही लोकप्रिय झाला. कंपनीचे संचालक हेमंत रेडकर यांच्या प्रयत्नांमुळे 'खो-गो'ने गुणवत्ता टिकवून ठेवत आयुर्वेदिक परंपरा जपली आहे. या सन्मानामुळे 'खो-गो'च्या लोकप्रियतेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

# लघुशंका करताना इमारतीच्या डक्टमध्ये पडून मजुराचा मृत्यू

■ विरार

बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्याच्या डक्टमधून खाली पडून मजुराचा मृत्यू झाला. तो लघुशंका करण्यासाठी गेला असताना ही दुर्घटना घडली.

विरार पश्चिमेच्या चिखलडोंगरी येथे एकता पार्क व्हिले या इमारतीचे काम सुरू आहे. बांधकाम मजूर याच इमारतीत राहतात. कन्हैयालाल प्रसाद (३८) काही दिवसांपूर्वी येथे कामाला आला होता.

काल रात्री तो मोबाईलवर आयपीएल क्रिकेटचे सामने बघत होता. रात्री अकराच्या सुमारास तो लघुशंका करण्यासाठी इमारतीच्या मोकळ्या जागेमध्ये गेला. मात्र तोल जाऊन तो खाली पडला. त्यावेळी खाली असलेल्या लोखंडी सळ्या त्याच्या डोक्यात शिरल्या आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी बोळींज पोलीस ठाण्यात अपमृत्यूची नोंद करण्यात आली आहे

# ठाणे महापालिका आयुक्तांना हायकोर्टाची अवमान नोटीस

■ ठाणे

**ठाणे** महानगरपालिकेने न्यायालयाच्या आदेशाकडे दुर्लक्ष केल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाने कडक भूमिका घेत ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव आणि नगररचना विभागाचे सहाय्यक संचालक संग्राम कनाडे यांच्याविरोधात अवमानाची नोटीस बजावली आहे. पुढील सुनावणीवेळी दोघांना न्यायालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.




न्या. रवींद्र घुगे आणि अभय मंत्री यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. न्यायालयाने ठाणे पालिकेला फटकारत, वारंवार आदेश देऊनही त्याची अंमलबजावणी न केल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. प्रकरण मानपाडा येथील सुमारे १०० एकर जमिनीशी संबंधित आहे. डी. दाह्याभाई अँड कंपनी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या जमिनीच्या बदल्यात विकास हक्क प्रमाणपत्र किंवा ट्रान्सफरेबल डेव्हलपमेंट राईट्स देण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. २५ फेब्रुवारीपासून २१ दिवसांच्या आत हे आदेश पूर्ण करण्यास सांगण्यात आले होते. मात्र, ठाणे महापालिकेकडून या आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली नाही. त्यामुळे संबंधित कंपनीने उच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल केली होती. या याचिकेची गंभीर दखल घेत न्यायालयाने पालिकेवर ताशेरे ओढले. न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सांगितले की, पालिका आपल्या भूमिकेतून मागे फिरू शकत नाही. वारंवार संधी देऊनही आदेशाचे पालन न केल्यामुळे न्यायालयाचा संयम संपला आहे. त्यामुळे जबाबदार अधिकाऱ्यांवर अवमानाची कारवाई का करू नये.

# ठेकेदारांच्या संपामुळे नाशिकमध्ये काम ठप्प

■ नाशिक

**महाराष्ट्रातील** ठेकेदारांनी थकीत देयके न मिळाल्याच्या निषेधार्थ ७ एप्रिलपासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले असून, राज्यभरात सुमारे ९६,४०० कोटी रुपयांची देयके प्रलंबित असल्याचा दावा ठेकेदारांनी केला आहे. त्याचे पडसाद नाशिकमध्येही उमटू लागले आहेत. नाशिकमध्ये जल जीवन मिशन ठेकेदारांचे कामबंद आंदोलन केले. नाशिक जिल्ह्यात जल जीवन मिशनच्या विविध कामांमध्ये गुंतलेल्या ठेकेदारांनी निधीअभावी कामे थांबवली आहेत.


# रेलवन ॲपमध्ये बिघाड! प्रवासात तिकीट बुकिंग

■ मुंबई

**बनावट** तिकीट प्रकरणांना आळा घालण्यासाठी भारतीय रेल्वेकडून सुरू करण्यात आलेल्या रेलवन तिकीट बुकिंग ॲपमध्येच आता तांत्रिक त्रुटी आढळल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे. जिओ-फेन्सिंगसारखी अत्याधुनिक सुविधा असतानाही प्रवासी चालू ट्रेनमध्ये तिकीट बुक करू शकत असल्याचे उघड झाले आहे.

पूर्वीच्या यूटीएस ॲपमधील क्यूआर कोड आधारित तिकीट प्रणालीचा गैरवापर होत असल्याचे उघड झाल्यानंतर रेल्वे बोर्डाने ते बंद करण्याचा निर्णय घेतला होता. त्याऐवजी रेलवन ॲप लाँच करण्यात आले. या नव्या ॲपमध्ये सुरुवातीला लॉग इन करताना अडचणी येत होत्या. त्यानंतर ॲपमधील वॉलेट प्रणालीमुळे प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागला. प्रवाशांचे हजारो रुपये वॉलेटमध्ये अडकून पडले. आता चालू ट्रेनमध्ये असतानाच तिकीट बुक होत आहे. कल्याणकडे जाणाऱ्या एसी लोकलमध्ये तिकीट तपासणीदरम्यान एका प्रवाशाने प्रवास सुरू असतानाच तिकीट काढल्याचे आढळले. तिकिटाची वेळ तपासल्यावर ते नुकतेच बुक केल्याचे स्पष्ट झाले. ही बाब टीसीच्या लक्षात आल्यानंतर तात्काळ वाणिज्य विभागाला कळवण्यात आली. रेलवन ॲपमध्ये जिओ-फेन्सिंग तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. या प्रणालीद्वारे प्रवाशांना केवळ स्टेशन परिसरात असतानाच तिकीट बुकिंग करता यावे, अशी संकल्पना आहे. मात्र प्रत्यक्षात ही प्रणाली प्रवाशांना ट्रेनमध्ये असतानाही तिकीट काढण्यापासून रोखण्यात अपयशी ठरत असल्याचे दिसून आले आहे.

## नवाकाळ शब्दकोडे–१५७३



**आडवे शब्द –**

२. उट्टे, बदला ५. प्रचलित, पडलेली पद्धत ७. कमी दर्जाचे ९. उत्तर ११. मुलींच्या पायातला अलंकार १२. गणपती १४. स्वच्छ नसलेले, ज्यात मातीचा अंश आहे असे पाणी १५. डाव्या विचारसरणीचा १८. फालतू, वाया, प्रामुख्याने खर्चाच्या बाबतीत वापरला जाणारा शब्द २०. नेत्रांजन २२. जेवायला न मिळणे २४. व्यवस्थित २७. मिळकत २८. नवऱ्याचा भाऊ २९. मयसभा बांधल्यावर पांडवांनी केलेला यज्ञ ३१. पत्नी ३२. विरोध, अडथळा ३३. दुधाचे पक्वान्न ३५. पक्ष्याचे घर ३६. चहा, दूध, बासुंदीला सुगंध देणारा, मसाल्यातही वापरला जाणारा पदार्थ ३७. उपवासाचे तांदूळ, त्यापासून केला जाणारा भात ३९. वडील ४०. नसत्या उचापती करणारा ४२. ताकद, शक्ती ४४. सूचनेचा तक्ता ४६. तरुणी ४८. गाणे रचणारा ५०. सहस्रावधी ५३. लोभी ५५. मग्न, तल्लीन ५६. बालंट ५७. कागदाच्या कपट्याप्रमाणे क्षुद्र ५८. उंदीरवर्गातील हा मोठा प्राणी काहीही पोखरू शकतो ६०. शिवाजीराजांचे हे शस्त्र आता इंग्लंडच्या संग्रहालयामध्ये आहे ६४. कलाकाराला दिलेला प्रतिसाद, वाहवा ६५. ठेका ६७. पावलांचा आवाज ६८. चरण, पद ६९. कष्टाळू, कणखर ७१. अंश, अवयव ७२. किनारा ७३. प्रचंड ७४. वडिलांची बहीण ७५. दाणेदार ८१. संन्यासी ८२. समंजस ८५. सुरेल, गोड ८८. रक्तवाहिनी ८९. पाय मागे घेणे ९०. मृदू ९१. बलाक पक्षी ९४. श्रवणेंद्रिय ९५. तीळाची एक जात, कारळे ९७. व्यर्थ ९८. संपूर्ण बदल १०१. धोतराचे टोक १०२. आंब्याचे बन १०४. नशीब इंग्रजीत १०६. अस्थिर १०७. व्यवस्थित १०८. विष्णुचे एक नाव, रमापती

**उभे शब्द –**

१. गुणांची पारख नसलेला ३. रूची ४. कबुतराच्या जातीचा पक्षी ६. फार सैल कपडा ७. कडा ८. रसदार ९. सैनिक, तरुण १०. न्यायालयातील फिर्यादी १३. केविलवाणी स्थिती १६. प्रौढी मिरवणारा १७. नवी फूट, पालवी १९. चीर, भेग २१. विश्व २२. विभूती २३. चंद्र २५. क्रिकेटमध्ये फलंदाज बाद होण्याचा एक प्रकार २६. शिसपेन्सिलने लिहिलेला मजकूर खोडण्याचे साधन २७. टणक, अवघड ३०. प्रतिशोध ३१. लहानपण ३२. जाळ ३४. परीट ३६. पुस्तकातील उतारा ३७. राम वनवासात असताना त्याच्या वतीने राज्य सांभाळणारा भाऊ ३८. बाष्प ४०. ददात ४१. निरूपयोगी माणसांची भरताड ४३. विष्णूचा अवतार ४५. लाजिरवाणे ४७. थोरवी ४९. अंगना, स्त्री ५०. भावनाप्रधान ५१. आजार ५२. भांडणाचे उकरून काढलेले निमित्त ५४. पोपट, रावा ५६. सदन ५७. अजिबात (नाही) ५९. बेचव ६१. येणे जाणे, राबता ६२. शोध ६३. पराक्रमी स्त्री ६६. लोचट ६९. पार्वती ७०. हात ७६. चर्चेच्या फेऱ्या ७७. श्रमिक ७८. पाहुणचार ७९. मिसळलेले, एकत्र केलेले ८०. अविचारी खर्च ८३. चिंतन ८४. अंधःकार ८६. इंद्राचे शस्त्र ८७. एकूण एक, सगळे ९२. सत्त्व ९३. लबाड ९४. चहाडी ९५. पहिलवानाचा नियमित आहार ९६. शनिचा खडा ९९. अग्नी १००. अडचण १०१. चंद्र १०३. आश्रम १०५. गायन, वादन इत्यादी चौसष्ठ कौशल्ये •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५७२ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. शेतकरी ४. चाकोरीबद्ध ७. कसाबसा १०. चाबूक ११. खूळ १२. घर १४. फल १६. रूक्ष १८. झेप २०. करवतकाठी २१. चीज २३. मासला २५. प्रणिपात २७. मैना २८. बया २९. माथा ३०. विरस ३३. यार ३४. मसलत ३६. कुळीथ ३८. कवाड ३९. मदमस्त ४०. चल ४१. डरकाळी ४३. पाळणा ४४. कढी ४६. भार्या ४७. लगेच ४८. अनेक ५०. गहाळ ५२. पक्ष ५३. नाथ ५५. काळ ५६. मजा ५७. भरपूर ५८. कनक ६०. किडा ६१. व्यथित ६४. सर्व ६५. अवाजवी ६६. रखवालदार ७०. कडा ७४. नेताजी ७५. हाक ७७. सविता ८०. कचकच ८१. नेत्र ८२. लता ८४. वाटसरू ८५. कापड ८६. पण ८७. बकरा ८९. तुरट ९०. प्रसंग ९१. मल्ल ९२. पाडस ९३. शांतता ९५. विहग ९७. नवीन ९९. तोबरा १०१. परवशता १०४. पौष १०५. गरीब १०६. पवनपुत्र

**उभे शब्द** : १. बाचाबाची २. शेकरू ३. कज्जा ४. चाळ ५. रीघ ६. बरकत ८. सावकाश ९. साफ ११. खूप १३. सावकार १५. लक्ष्मीनारायणाचा जोडा १७. क्षमा १८. झेला १९. पाणि २२. जबरदस्तीने २४. सकस २५. प्रथा २६. पाकळी २९. मात ३१. सकळीक ३२. सडपातळ ३३. याम ३४. मस्तक ३५. लड्डू ३६. कुल ३७. थडगे ४०. चर्या ४२. रचना ४५. ढीग ४६. भाळ ४७. लक्षपूर्वक ४८. अपव्यय ४९. कमतरता ५१. हानी ५२. परस ५४. थकवा ५५. काकवी ५९. नजर ६०. किल्ला ६२. पावा ६३. निंदा ६७. खजील ६८. लक्ष्य ६९. रहाट ७१. डास ७२. पेचप्रसंग ७३. सूचना ७४. नेत्रपल्लवी ७६. कसरतपटू ७८. विकारवश ७९. तापट ८३. ताबडतोब ८४. वारा ८८. कसब ९०. प्रहसन ९१. मनस्वी ९४. तार ९६. रोष ९८. नग १००. राधा १०२. वधू १०३. ताप १०४. पौत्र




## राशिभविष्य

**रविवार १२/०४/२०२६ ते शनिवार १८/०४/२०२६**

### ● मेष

**अत्यंत** सावधगिरीने व स्थिर मनाने कार्य करण्याचा संदेश हा आठवडा देत आहे. काम व जबाबदारी वाढणार आहे. तुमच्या मनाप्रमाणे सध्या घटना घडणार नाही. तुमच्यातील नेतृत्वकौशल्याचा चतुराईने उपयोग करून घ्या. त्याचे चीज होईल. आर्थिक स्थिती सर्वसाधारण असेल. लाभाचे प्रमाण वाढले तरीही पैसे अडकून पडण्याची शक्यता आहे. आर्थिक जोखीम घेऊ नका. नियोजनबद्ध कृतीला महत्त्व द्यावे. मनावर दडपण वाटेल तरीही स्थिर मनाने निर्णय घ्यावेत. यश मिळेल.

चैनीच्या वस्तू खरेदी करण्याकडे कल राहील. जोडीदाराच्या अपेक्षा वाढतील. मुलांच्या बाबतीत अलिप्त धोरण ठेवून व्यवहारी व कठोर निर्णय घ्यावे लागतील. भावंडे व मित्रपरिवार त्यासाठी खर्च करताना विचार करा. धार्मिक पर्यटन करू शकाल.

कार्यक्षेत्रामध्ये अनेक आघाड्यांवर लक्ष द्यावे लागेल. परंतु नियम, आजूबाजूची परिस्थिती यामुळे प्रत्यक्षात कृती करताना मर्यादा जाणवतील. संयम ठेवा. भागीदारीतील व्यवसाय यश देतील. नवीन व्यवहार आकर्षक वाटले तरीही सावधगिरीने पावले उचलावीत. प्रवासात अचानक व अनपेक्षित अडथळे येऊ शकतात.

**शुभ दिनांक :** १२,१३,१४,१८.

### ● वृषभ

आठवड्याचा मध्य महत्त्वाच्या कामांसाठी चांगला राहील. लाभाचे प्रमाण वाढल्यामुळे धनसंचय योग्य रीतीने करू शकाल. मात्र अपेक्षित लाभ मिळवण्यासाठी जास्त श्रम सुद्धा करावे लागतील. मनाप्रमाणे वागण्याला थोड्या मर्यादा घालाव्या लागतील. दैनंदिन कामकाजात संयम ठेवून सातत्य ठेवावे लागेल. कोर्टकचेरीशी संबंधित कामे संथ गतीने होणार आहेत. बोलताना काळजी घ्या.

आईवडिलांच्या आरोग्याची काळजी घ्या. कुटुंब व मुलासाठी खर्च वाढला तरी तो योग्य कारणासाठी होईल. मुलांशी संवाद साधताना सौम्यपणे बोला. वडिलोपार्जित संपत्तीचा प्रश्न असल्यास तो मार्गी लावण्यासाठी प्रयत्न चालू करा. भावंडांशी मतभेद होणार नाहीत याची काळजी घ्यावी.

कार्यक्षेत्रामध्ये अचानक नवीन संधी उपलब्ध होईल. सारासार विचार करूनच निर्णय घ्यावा. प्रवास शक्यतो टाळावा. नोकरदारांना प्रतिस्पर्ध्यांवर मात करता येईल. वरिष्ठांचे सहकार्य गृहीत धरू नका. व्यावसायिकांनी कार्यप्रणालीमध्ये बदल केल्यास फायदा होईल.
आरोग्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका.

**शुभ दिनांक :** १३, १४

### ● मिथुन

राशीस्वामी बुध कर्मस्थानी असल्यामुळे कर्तबगारी दाखवण्यास संधी मिळतील. आठवड्याचा उत्तरार्ध महत्त्वाच्या कामांसाठी योग्य ठरेल. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. मनातील नवीन कल्पना प्रत्यक्षात आणू शकाल. शक्य झाल्यास प्रवास टाळावेत. अनेक गोष्टी समोर येत असल्या तरीही महत्त्वाच्या कामांवरच लक्ष केंद्रित करा. मानसिक आंदोलने वाढतील. त्याचा परिणाम निर्णयक्षमतेवर होऊ शकतो. अति आत्मविश्वास त्रासदायक ठरेल. तुमच्या श्रमाला, प्रयत्नांना योग्य दिशा आवश्यक आहे. घरामध्ये संमिश्र वातावरण राहील. जोडीदाराचे सहकार्य मिळेल. कार्यक्षेत्रामध्ये जबाबदारी वाढल्यामुळे घराकडे दुर्लक्ष करू नका. घरातील ज्येष्ठांच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे. मुलांची प्रगती होईल. मित्रपरिवाराबरोबर आनंदात वेळ घालवाल. नोकरदारांनी आपल्या क्षमतेनुसारच जबाबदारी घ्यावी. अधिकार वाढतील. व्यावसायिकांना अनेक आघाड्यांवर लक्ष द्यावे. लागेल. कार्यशैलीमध्ये जुन्या पद्धतीबरोबरच नवीन बदल उपयुक्त ठरेल. भागीदारीत मतभेदांची शक्यता आहे.

**शुभ दिनांक :** १८

### ● कर्क

आठवड्याची सुरुवात व अखेर महत्त्वाच्या कामांसाठी योग्य आहे. मधला काळ अडथळ्यांचा राहील. इच्छाशक्तीच्या जोरावर अनेक महत्त्वाची कामे पार पाडू शकाल. विचारांती घेतलेल्या निर्णयावर ठाम रहावे. भावना व व्यवहार यामध्ये समन्वय हवा. अनेक गोष्टींमध्ये बदल होणार आहे. आत्ता जरी तणाव वाटत असेल तरी भविष्यामध्ये याचे सकारात्मक परिणाम दिसतील. कुठल्याही गोष्टीची सुरुवात करताना अडचणी जाणवणार आहेत. तुमच्या प्रयत्नांमध्ये कमी पडू नका. आर्थिक स्थिती सर्वसाधारण राहील.

कुटुंबामध्ये संमिश्र वातावरण राहील. नवीन खरेदी, गृह सजावट, याबाबत चर्चा होईल. घरातील ज्येष्ठांशी मतभेद टाळा. जोडीदाराच्या मताचा आदर करावा. मुलांच्या बाबतीत सकारात्मक गोष्टी घडतील. भावंडांचे सहकार्य मिळेल. वास्तुखरेदीचा योग आहे.

उद्योगव्यवसायात मोठ्या बदलाच्या दृष्टीने निर्णय घेता येतील. अति धाडस मात्र टाळावे. नेतृत्वकौशल्य उपयोगात आणा. सहकाऱ्यांची साथ मिळेल. वादविवाद टाळून चतुराईने परिस्थिती हाताळावी. जुने कर्ज फेडू शकाल.

**शुभ दिनांक :** १२, १८

### ● सिंह

आठवड्याचा पूर्वार्ध चांगला जाईल. परिस्थितीवर मात करता येईल. सध्या अत्यंत संघर्षाचा काळ आहे. मनाविरुद्ध, स्वभावाविरुद्ध वागावे लागेल. भविष्यातील फायद्याच्या दृष्टीने ते योग्य ठरणार आहे. मोठी जोखीम घेणे, आक्रमक वृत्ती टाळावी. संयमित नेतृत्वकौशल्य उपयोगी ठरेल. उत्साह कायम ठेवा. योग्य दिशेने प्रयत्न करावे लागतील. गरज पडल्यास अनुभवी, तज्ज्ञ व्यक्तीचा सल्ला घ्या.आर्थिक स्थिती साधारण चांगली राहील. आठवड्याच्या अखेरीला भाग्याची साथ मिळेल.

कुटुंबामध्ये सर्वांना बरोबर घेऊन पुढे जावे. त्यासाठी सुसंवाद अत्यंत महत्त्वाचा राहील. मुलांच्या दृष्टीने शुभ काळ आहे. महत्त्वाचे निर्णय घ्यावेत. जोडीदाराशी जमवून घ्या. वैचारिक मतभेद राहतील. भावंडांचे सहकार्य मिळेल.

उद्योगव्यवसायात आधी केलेल्या श्रमाचे फलित आता मिळणार आहे. तुमच्या कामाचे कौतुक होईल. वर्चस्व मान्य केले जाईल. तोपर्यंत संयम ठेवा. नोकरीमध्ये श्रमाला सध्या तरी पर्याय नाही. कार्यपद्धतीत बदल होऊ शकतो.

**शुभ दिनांक :** १२,१३,१४

### ● कन्या

सुरुवातीला कामामध्ये अडथळे जाणवतील. आठवड्याचा मध्य महत्त्वाच्या कामासाठी योग्य आहे. आजूबाजूची परिस्थिती संघर्ष करायला लावणार आहे. कुठलेही अतिधाडस सध्या करू नये. लाभाचे प्रमाण साधारण राहील. आर्थिक जोखीम पत्करून गुंतवणूक करू नये. धनसंचय होण्यासाठी बचतीचा मार्ग योग्य राहील. मनामध्ये राग, नैराश्य अशा संमिश्र भावना निर्माण होतील. याचा परिणाम निर्णयक्षमतेवर होऊ देऊ नका. वेळप्रसंगी विश्वासू व्यक्तीचा सल्ला घ्या. तुमच्या संघर्षात कुटुंबातील सदस्यांची साथ मिळेल. मुलांच्या प्रगतीसंबंधी योग्य ते निर्णय योग्य वेळेत घ्यावे. त्यांच्या वाढलेल्या अपेक्षा पूर्ण करताना थोडी तारांबळ उडेल. भावनेच्या भरात कृती करणे टाळा. उद्योगव्यवसायात छुपे इथे शत्रू कार्यरत झाले असले तरीही तुमच्या बुद्धीचातुर्याने तुम्ही त्यावर नियंत्रण मिळवाल. तुमच्या क्षम तेइतकेच काम स्वीकारावे. कोणाच्या मदतीची, सहकार्याची अपेक्षा ठेवू नका. नोकरदारांना कामाचे श्रेय मिळेल. बढतीचा योग आहे. भागीदारीत व्यवसाय असणाऱ्यांनी सावधगिरी बाळगावी. अहंकार त्रासदायक ठरेल.

**शुभ दिनांक :** १३, १४

### ● तूळ

केलेल्या कामाचे श्रेय तुम्हाला आठवड्याच्या उत्तरार्धात मिळेल. मानसिक स्थैर्य खूप महत्त्वाचे राहतील. निर्णयक्षमता व आत्मविश्वास कमी होऊ देऊ नका. चैनीकडे कल राहील. मात्र कामाची गती वाढवावी लागेल. महत्त्वाच्या कामांवर लक्ष केंद्रित करा. घाईगडबडीत निर्णय घेणे टाळावे. प्रवासाचे योग आहे. आर्थिक स्थिती सर्वसाधारण चांगली राहील. या आठवड्यात तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा चांगला प्रभाव इतरांवर पडेल.

कुटुंबामध्ये वादाचे प्रसंग चतुराईने हाताळला. वादग्रस्त विषयांबाबत निर्णय पुढे ढकला. मुले, जोडीदार यांचे मत विचारात घ्यावे. भावंडांशी सौख्य राहील. अविवाहितांच्या विवाहासंबंधी सकारात्मक बोलणी होतील.

उद्योगव्यवसायामध्ये नवीन गुंतवणूक सध्या करू नये. भागीदारीतील व्यवसायामधून फायदा असला तरीही दोघांमध्ये सुसंवाद महत्त्वाचा आहे. भागीदाराचे वर्चस्व राहील. तुमच्या नवीन योजना प्रत्यक्षात आणताना संयम ठेवा. नोकरदारांना विविध आघाड्यांवर लक्ष द्यावे लागेल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल.

**शुभ दिनांक :** १४, १८

### ● वृश्चिक

आठवड्याची सुरुवात चांगली होईल. मधला काळ थोडा चिंतेचा राहील परंतु आठवड्याची अखेर समाधानाची राहील. संघर्षाचा काळ आहे हे विसरू नका. मेहनत करण्यासाठी तुम्ही मागेपुढे पाहत नाही. प्रयत्नांना योग्य दिशा दिल्यास उचित फलित मिळेल. मानसिक अस्वस्थता वाढल्यामुळे निर्णय घेण्यास त्रास होऊ शकतो. कामाची गती मंदावेल. आर्थिक स्थिती साधारण चांगली राहील. बचत समाधानकारक राहील.

घरामध्ये विनाकारण गैरसमज होऊ शकतो. भावनांचा कल्लोळ नियंत्रणात ठेवा. त्यामुळे नात्यामध्ये सुसंवाद ठेवू शकाल. संतती व जोडीदार यांना तुमच्या मदतीची गरज लागेल. घरातील ज्येष्ठांच्या तब्येतीकडे लक्ष द्यावे. त्यांच्या सल्ल्याचा उपयोग होईल.

कार्यक्षेत्रामध्ये काही बदल होतील. नियोजनबद्ध हालचाली उपयोगी पडतील. नोकरदार नोकरीत बदल करू शकतात. फक्त नवीन संधी काळजीपूर्वक स्वीकारावी. कामाची गती वाढवावी लागेल. पूर्वानुभव व संयम यामुळे काम पूर्ण करू शकाल. मतभेदाचे प्रसंग टाळावेत.
वाहन चालवताना काळजी घ्यावी.

**शुभ दिनांक :** १२, १३, १८

### ● धनु

एकंदरीत आठवडा धावपळीचा व संघर्षाचा राहील. राशीस्वामी गुरु तुमच्या मदतीसाठी आहे ही जमेची बाजू विसरू नका. परिश्रम वाढणार आहेत. त्याचे फलित मिळण्यासाठी संयम ठेवावा लागेल. आठवड्याच्या मध्यावर नवीन संधी मिळेल. प्रवासाचे योग आहे. आर्थिक समस्या कमी होतील. पैसे अडकून राहणार नाही यासाठी सावध राहावे. महत्त्वाचे निर्णय, मोठी गुंतवणूक पुढे ढकलावी. नियोजित कामासाठी पूर्ण माहिती गोळा करणे, नियोजन या दृष्टीने हा काळ योग्य आहे.

कुटुंबातील वातावरण संमिश्र राहील. मनस्वास्थ्य स्थिर ठेवणे तुमच्यासाठी आवश्यक राहील. कौटुंबिक हिताच्या दृष्टीने काही व्यावहारिक व कठोर निर्णय घ्यावे लागतील. जोडीदार व संततीबरोबर समन्वय ठेवा. उत्तरार्धात मुलांची प्रगती समाधानकारक राहील.

कार्यक्षेत्रामध्ये अनपेक्षित व सकारात्मक घडामोडी घडू शकतात. लाभाचे प्रमाण चांगले राहील परंतु गती मात्र कमी राहील. कुठेही जोखीम घेणे टाळा. मतभेदाचे प्रसंग चतुराईने हाताळावे. सहकारी वर्गाची मदत उपयोगी राहील. कलानिर्मिती क्षेत्रामधील व्यक्तींसाठी चांगला काळ आहे.

**शुभ दिनांक :** १३, १४

### ● मकर

या आठवड्यात संमिश्र ग्रहमान आहे. विरोधकांचा प्रभाव वाढणार आहे. हातून चुका होणार नाहीत, कामे योग्य वेळेतच होतील याकडे आवर्जून लक्ष द्यावे. कामाचे नियोजन योग्य प्रकारे, अनुभवी तज्ज्ञ व्यक्तीच्या सल्ल्याने करा. नुकसान टाळण्यासाठी सध्या आर्थिक जोखीम पत्करू नये. उत्साह कमी राहील. आत्मविश्वास कमी होऊ देऊ नका.

कुटुंबामध्ये विनाकारण गैरसमज होतील. छोट्या मोठ्या समस्या सुसंवादाने सोडवू शकाल. सर्व आघाड्यांवर लक्ष द्यावे लागेल. त्यामुळे तारांबळ होऊ शकते. घरामध्ये आनंदी परंतु शिस्तीचे वातावरण राहील.

कार्यक्षेत्रामध्ये नोकरदारांनी स्वतःच्या कामाला प्राधान्य देऊन त्यावरच लक्ष केंद्रित करावे. कुणाच्याही सहकार्याची अपेक्षा ठेवू नका. नियोजनबद्ध कार्यप्रणाली व्यावसायिकांना योग्य करेल. आवश्यकतेनुसार पर्यायी व्यवस्थाही तयार ठेवावी. आत्ताच्या कष्टाचे भविष्यात फायदे नक्की दिसतील. सध्या तुमच्या कर्तृत्वाला बंधने येणार आहेत. संयम ठेवावा.

**शुभ दिनांक :** १२, १८

### ● कुंभ

आठवड्याच्या सुरुवातीला कामाचे दडपण, बंधन जाणवले तरी हळूहळू त्यातून मार्ग निघेल. मनाची तयारी असली तरी अनुभवी व्यक्तीच्या सल्ल्याने निर्णय घ्यावेत. महत्त्वाच्या कामांवरच लक्ष केंद्रित करा. निरुत्साही वातावरण वाटले तरीही संयमाने परिस्थितीला तोंड द्यावे. आठवड्याच्या शेवटी अनेक समस्यांमधून मार्ग निघालेला असेल. आर्थिक कोंडी टाळण्यासाठी बचतीचा मार्गच योग्य ठरणार आहे.

कुटुंबामध्ये एकाच वेळी अनेक आघाड्यांवर लढावे लागेल. तुम्ही पुढाकार घेऊन योग्य दिशेने प्रयत्न करा. त्यात यशस्वी व्हाल. वेळप्रसंगी थोडी माघार घेणे योग्य ठरेल. धार्मिक पर्यटनाचा योग आहे. जोडीदाराबरोबर सहलीचे आयोजनही होऊ शकते. संततीच्या अपेक्षा पूर्ण कराल.

नोकरदारांना स्पर्धात्मक वातावरणात काम करावे लागेल. त्यामुळे त्यानुसारच तुमचे लवचिक धोरण ठेवा. तुमच्या योजना जाहीर करू नका. व्यावसायिकांना शत्रु ओळखून त्याप्रमाणे कार्यशैली ठेवावी लागेल. आधीचे अडकलेले कामाचे पैसे मिळू शकतात योग्य प्रयत्न करा. व्यवसायवाढीसाठी नवीन तंत्रज्ञान, जाहिरातीचा उपयोग होईल.

**शुभ दिनांक :** १३, १४, १८

### ● मीन

सध्याचा काळ अडचणीचा असला तरीही धैर्य न सोडता खंबीर राहावे. भावना व व्यवहार यामध्ये समतोल साधावा. सर्व बाजूंनी कोंडी झाली असली तरीही लवकरच यातून बाहेर पडाल. राशी स्वामी गुरु चांगल्या स्थितीत आहे हे विसरू नका. मानसिक आंदोलने निर्णयक्षमतेवर परिणाम करतील. आर्थिक स्थिती सुधारणार आहे. आर्थिक गुंतवणुकीस मात्र अजून योग्य काळ नाही.

कौटुंबिक जबाबदारी पार पाडावी लागेल. त्यासाठी खर्चाची तयारी ठेवा. भावंडांचे, जोडीदाराचे सहकार्य मिळेल. मतभेद वाढू देऊ नका. कटू शब्द टाळावेत. स्वभावात आलेली आक्रमक वृत्ती नियंत्रणात ठेवा. नातेसंबंध सांभाळताना कुणावर अन्याय होणार नाही याकडे लक्ष द्यावे. उद्योगव्यवसायात नवीन व्यवहारातून आर्थिक लाभ होऊ शकतात. मात्र कायदेशीर बाबी पूर्ण तपासून खात्री करावी. कर्ज देणे व घेणे जोखमीचे राहील. नोकरदारांनी नियमानुसार काम करावे. वरिष्ठांचे सहकार्य मिळू शकते. नोकरदारांनी व व्यावसायिकांनी झटपट लाभाच्या अमिषापासून स्वतःला दूर ठेवावे. अभ्यासपूर्ण धाडस योग्य ठरेल. शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले ठेवायला प्राधान्य द्यावे.

**शुभ दिनांक :** १२, १८

– ज्योतिषपंडित-प्रज्ञा धनंजय, पुणे

## क्षयरोगावरील दोन्ही नवीन लसी चाचणीमध्ये सुरक्षित

■ नवी दिल्ली

क्षयरोगावरील व्हीपीएम १००२ आणि इम्युनोव्हॅक या दोन नवीन लशींच्या तिसऱ्या टप्प्यातील चाचणीत सुरक्षित आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवणाऱ्या आढळल्या आहेत. फुफ्फुसाबाहेरील क्षयरोग रोखण्यात आणि ६-१४ वर्षे वयोगटातील मुलांसाठी अधिक प्रभावी असल्याचे दिसून आले आहे. परंतु या लसी सर्व प्रकारच्या टीबीवर पूर्णपणे परिणामकारक नाहीत, असेही आढळले आहेत.

'द ब्रिटिश मेडिकल जर्नल' मध्ये प्रकाशित झालेल्या तिसऱ्या टप्प्यातील चाचणीच्या निकालांनुसार, क्षयरोगाच्या दोन नवीन लसी भारतातील प्रौढ आणि मुलांसाठी सुरक्षित असू शकतात, परंतु त्या या संसर्गजन्य जिवाणूजन्य रोगाच्या सर्व प्रकारांपासून संरक्षण देऊ शकणार नाहीत. दोन्हीपैकी कोणतीही लस कमी वजन असलेल्या मुलांचे आणि प्रौढांचे संरक्षण करू शकलेली नाही, त्यामुळे लसीकरणासोबतच, विशेषतः लहान मुलांसाठी,पौष्टिक आहाराची गरज भासू शकते, असे संशोधकांनी म्हटले आहे.

इम्युनोव्हॅक ही लस भारतीय वैद्यकीय संशोधन




परिषदेच्या संशोधकांनी आणि अहमदाबादमधील कॅडिला फार्मास्युटिकल्स यांनी विकसित केली आहे. ही एक निष्क्रिय लस असून ती रोगजनकाच्या असंसर्गजन्य स्वरूपाचा वापर करून तयार केली जाते. संशोधकांनी सांगितले की, बीसीजी लस लहान मुलांमधील क्षयरोगाच्या गंभीर प्रकारांवर प्रभावी असली तरी ती किशोरवयीन आणि प्रौढांना संरक्षण देत नाही.

## पोटात दुखणाऱ्यांसाठीही झाड लावेन! एकनाथ शिंदेंचा टोला

**सातारा -** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सध्या साताऱ्यातील त्यांच्या मूळ गावी दरेगाव येथे मुक्कामी असून त्यांनी शेतात विविध फळझाडांची लागवड करत शेतीतील नव्या प्रयोगांना चालना दिली. त्यांनी शेतात वेळ घालवत वृक्षारोपण केल्याचे पाहायला मिळाले. मी शेतकऱ्याचा मुलगा आहे, मला शेती करायला आवडते. कोणाला काय वाटते, याकडे मी लक्ष देत नाही. ज्यांच्या पोटात दुखत त्यांच्यासाठीही एक झाड लावेन असा मिश्कील टोला त्यांनी यावेळी लगावला. यावेळी त्यांनी जर्दाळू(एप्रिकॉट), वोकाडो, सफरचंद यांसारख्या कॅश क्रॉप फळझाडांची लागवड केली. ही झाडे दोन ते तीन वर्षांत फळधारणा देण्याची अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले.

## महिला असल्याने मंत्र्यांनी डावलले मुख्य सचिव मनिषा म्हैसकरांचा आरोप

■ मुंबई

**राज्याच्या** अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर यांनी आपल्या प्रशासकीय कारकिर्दीतील धक्कादायक अनुभव मांडत, महायुती सरकारमधील एका मंत्राने महिला सचिव नको म्हणत आपल्याला डावलल्याचा आरोप केल्याने राजकीय वातावरण तापले आहे.

दिल्लीतील महिला अधिकाऱ्यांच्या संमेलनानिमित्त प्रकाशित सौदामिनी स्मरणिकेत त्यांनी हा अनुभव मांडला आहे. त्या म्हणाल्या की, ;२०२३ मध्ये राज्यात नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर जेव्हा वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि नियुक्त्यांची प्रक्रिया सुरू होती,



तेव्हा एका मंत्राने मला आपल्या विभागात घेण्यास स्पष्ट नकार दिला होता. माझ्या तीन दशकांहून अधिक काळच्या सेवेत मी अनेक आव्हानात्मक जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. मात्र, केवळ 'स्त्री' आहे म्हणून एखाद्या मंत्राने डावलल्याचा हा अनुभव मला पहिल्यांदाच आला. विशेष म्हणजे, संबंधित मंत्राने माझ्या कामाच्या क्षमतेवर शंका न घेता, केवळ महिला सचिव नको असल्याची भूमिका घेतली होती. म्हैसकर यांनी संबंधित मंत्राचे नाव जाहीर केले नसले तरी '२०२३ मधील सरकार' असा उल्लेख केल्याने हा आरोप महायुती सरकारमधील एका मंत्र्यावर असल्याची चर्चा सुरू झाली आहे. यावर सामाजिक कल्याण मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, मनीषा म्हैसकरांनी इतक्या उशिरा असा खुलासा करणे सरकारी अधिकारी म्हणून योग्य नाही.

## झिरवाळ व्हिडिओ प्रकरणातील गुन्हा रद्द करा!आरोपीची याचिका दाखल

■ मुंबई

**राज्याचे** अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या व्हायरल व्हिडिओ प्रकरणातील आरोपी तरुणाने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करत आपल्या तृतीयपंथी भावावरच खंडणी, ब्लॅकमेलिंग आणि गुन्हेगारी धमकीचे आरोप ठेवून गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. काही दिवसांपूर्वी नरहरी झिरवाळ यांचा कथित आक्षेपार्ह व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता.

या व्हिडिओत झिरवाळ तृतीयपंथीय व्यक्तीसोबत दिसल्याचा दावा करण्यात आला होता. हा व्हिडिओ संबंधित तृतीयपंथाच्या भावानेच व्हायरल केल्याचा आरोप आहे. त्यानंतर तृतीयपंथीय व्यक्तीने पोलिसांत भावाविरोधात तक्रार दाखल केली होती. मात्र, आता आरोपी भावाने उच्च न्यायालयात धाव घेत आपल्यावरील एफआयआर रद्द करण्याची मागणी केली आहे. माझ्यावरील सर्व आरोप खोटे असून मला जाणूनबुजून या प्रकरणात अडकवण्यात आले आहे. उलट संबंधित तृतीयपंथीय व्यक्तीवर खंडणी, ब्लॅकमेलिंग आणि कट रचल्याचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी त्याने केली आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## वितरण हानी कमी करण्यासाठी सातत्य आवश्यक -राजेंद्र पवार

■ मुंबई

**वीज** वितरण हानी आणखी कमी करण्यासाठी अभियंता आणि कर्मचाऱ्यांनी सातत्याने कार्यरत असले पाहिजे, असे प्रतिपादन महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी केले.

महावितरण कंपनीच्या कल्याण परिमंडळात आज संचालक राजेंद्र पवार यांनी आज आढावा बैठक घेतली. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात कल्याण परिमंडळाने चांगली कामगिरी बजावली आहे. वितरण क्षेत्रात असलेली हानी आणखी कमी केल्यास याचा लाभ आगामी काळात वीज ग्राहकांना होणार आहे. मान्सून तोंडावर आला आहे. यासाठी अभियंता आणि कर्मचाऱ्यांनी आतापासूनच मान्सून पूर्व कामे हाती घेऊन वेळेत पूर्ण करावीत जेणेकरुन पावसाळ्यात वीज ग्राहकांना त्रास होणार नाही. वीज ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण कमीत कमी वेळेत करण्याची सूचना यावेळी उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना केली.



उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना संचालक मानव संसाधन राजेंद्र पवार

मानव संसाधन विभागाच्या वतीने अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी प्रशासनाकडून करण्यात आलेल्या कल्याणकारी योजनांची माहिती दिली. मानव संसाधन विभागाने प्रलंबित विषय मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

बैठकीस कोकण प्रादेशिक कार्यालयाचे सह व्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे, कल्याण परिमंडळाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा, अधीक्षक अभियंता अनिल थोरात, विजय फुंडे, मंदार अत्रे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) सुशील पावसकर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी रामगोपाल अहिर उपस्थित होते.

## आज मुंबईत लोकलच्या तिन्ही मार्गावर मेगाब्लॉक

■ मुंबई

**अत्यावश्यक** अभियांत्रिकी कामे आणि देखभाल दुरुस्तीसाठी मध्य आणि पश्चिम रेल्वेने उद्या रविवार १२ एप्रिल रोजी लोकलच्या मध्य, हार्बर,पश्चिम अशा तिन्ही मार्गावर मेगाब्लॉक घोषित केला आहे.या काळात काही लोकल फेऱ्या रद्द किंवा धिम्या मार्गावर चालवल्या जातील.

हार्बर रेल्वे मार्गावर सीएसएमटी-वाशी /वांद्रे सकाळी ११.१० ते दुपारी ४.४० आणि पश्चिम रेल्वेवर सांताक्रूझ - गोरेगाव सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत ब्लॉक असणार आहे.या काळात अप आणि डाउन जलद लाईन सेवा धिम्या मार्गावर चालेल.

तसेच मध्य रेल्वे मार्गावर सीएसएमटी ते विद्याविहार दरम्यान अप आणि डाउन धीम्या मार्गावर ब्लॉक असणार आहे. ब्लॉक कालावधीत काही लोकल फेऱ्या रद्द किंवा धीम्या मार्गावर चालवल्या जातील. तसेच प्रवाशांना या काळात हार्बर मार्गावरील प्रवाशांना मुख्य रेल्वे मार्ग किंवा पश्चिम रेल्वेवरून प्रवास करण्याची परवानगी असेल.

## हिंगोली, नांदेड, परभणीसह यवतमाळात भूकंपाचे धक्के

**हिंगोली** - मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड, परभणी तसेच यवतमाळ येथे आज सकाळी भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. सकाळी ८ वाजून ४७ मिनिटांनी झालेल्या या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.७ इतकी नोंदवण्यात आली आहे.

**पश्चिम रेल्वे**
**विद्युत काम**
वरि. विविअभि/पी/बीसीटी आमंत्रित करीत आहेत निविदा सूचना क्र.: ईएल-८१-३८-२०३-डब्ल्यूए-९१, दि. ०८.०४.२०२६. काम आणि ठिकाण: उधना: प्लॅटफॉर्म क्र. ६ वर प्लॅटफॉर्म, टॉयलेट ब्लॉक्स, आसन व्यवस्थेवर कव्हर पुरविणे आणि इतर किमान अत्यावश्यक सुविधांच्या संबंधात विद्युत (वीज) काम. कामाचे अंदाजित मूल्य: ₹ १,२६,७३,५७२.००. ईएमडी: ₹ २,५३,५००.०० सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: दि. ०७.०५.२०२६, १५.०० वा. पर्यंत. उघडण्याचा दिनांक आणि वेळ: दि. ०७.०५.२०२६, १५.३० वा. अधिक तपशिलाकरिता कृपया आमची वेबसाईट www.ireps.gov.in येथे भेट द्यावी. 1296
आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly

## दु:खद निधन



**कै. श्री. सतीश सुर्यकांत पितळे**

जन्म: १४ जुलै १९४९
मृत्यू :०६ एप्रिल २०२६

यांच्या दु:खद निधनाने आम्ही अत्यंत शोकाकुल आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो.

**भावपूर्ण श्रद्धांजली**

**समस्त पितळे कुटुंब**

